कालिदास,शेक्सपियर,भवभूती,गॉर्की,इन्सेन हे साहित्यिक ,हे विद्वान आज जगद्वंद्य ठरले आहेत .न्यूटन, आईनस्टाईन,जयंत नारळीकर सारख्या शास्त्रज्ञांचाही त्यात समावेश होतो . मानवी जीवन सुखी, संपन्न नि समृद्ध करण्यासाठी अविरत झटणाऱ्या सरस्वतीच्या लाडक्या सुपुत्रांची पूजा न झाली तरच नवल! विद्या ही नेहमीच फलदायी असते.सर्वांनाच फलदायी असते.ती दिल्याने वाढत जाते .तिच्यामुळे मानव हाच देव बनू शकतो. त्याच्या प्रतिमेला बहर, कर्तुत्वाला उधान व व्यक्तिमहत्त्वाला घुमारे फुटतात. ते या विद्येच्या उपासनेमुळे व अशा विद्येचे जे उपासक ते विद्वान सदा सर्वदा पुजले जातात .पौराणिक काळात,साम्राज्यात सम्राटपेक्षा खरी सत्ता या विद्वानांचीच असायची.

34). गावात हत्ती आला असता त्याला पाहण्यासाठी जन्मांध गेले. ज्याने हत्तीचा पाय पाहिला तो आंधळा म्हणाला हत्ती खांबासारखा. ज्याने हत्तीची सोंड पाहिली तो म्हणाला हत्ती मुसळासारखा. ज्याने कान पाहिला तो म्हणाला हत्ती सुपासारखा. ज्याने हत्तीची पाठ पहिली तो म्हणतो हत्ती भिंतीसारखा .ज्याने हत्तीचे पोट पाहिले तो म्हणतो हत्ती कोथळासारखा व ज्या आंळ्यांने हत्तीची शेपूट पाहिली तो म्हणाला हत्ती खराट्यासारखा असे आंधळ्यानी हत्तीचे वर्णन केले.

35) एकदा गावात हत्ती आला असता त्याला पाहायला जन्मांध लोक गेले. त्यातील एकाने पाय पाहिला. एकाने सोंड पाहिली.एकाने कान पाहिला.एकाने पोट पाहिले.एकाने हत्तीची पाठ पहिली.एकाने शेपूट पाहिली. मग ते एकमेकांना विचारू लागले की,हत्ती कसा आहे? पाय पाहिला तो म्हणाला हत्ती खांबासारखा! सोंड पाहणारा म्हणाला हत्ती मुसळासारखा! कान पाहिले लामहणाला हत्तीसुपासारखा !पाठ पाहिलेला म्हणाला हत्ती भिंतीसारखा! पोट पाहणारा म्हणाला हत्ती कोथळासारखा! व शेपूट पाहणारा म्हणाला हत्ती खराट्यासारखा! अशा रीतीने ते एकमेकास विरोध करू लागले;व आपलेच म्हणणे बरोबर आहे. असे ते म्हणू लागले. पण त्यामध्ये एक

डोळस माणूस होता तो म्हणाला, हा हत्तीचा एक एक अवयव झाला. सगळा हत्ती नव्हे. अशा सर्व अवयवांनी युक्त तो हत्ती होय.

36. अनंतशक्ती परमेश्वरू या कथेतून चक्रधर स्वामिनी परमेश्वराचे स्वरूप समजावून सांगितले आहे . या कथेत चक्रधर स्वामिनी एकेश्वरवाद, अहिंसा, समता आणि बंधुभाव व मानवतेचे तत्वज्ञान मांडले आहे. सर्व जीवांमध्ये परमेश्वराचा अंश आहे. त्यामुळे जात, पंथ, उच्च, नीच असा भेदभाव न करता सर्वांशी समतेने आणि प्रेमाने वागावे असा संदेश दिला आहे. परमेश्वराचे स्वरूप व्यापक आहे सर्व शक्तिनी मिळून परमेश्वर बनतो असे तत्वज्ञान मांडले आहे. ज्याप्रमाने जन्माध लोक हत्तीच्या एक एक अवयवाला पूर्ण हत्ती मानतात त्याप्रमाणे काही लोक परमेश्वराच्या केवळ एका शक्तीचा अनुभव घेऊन तिलाच पूर्ण परमेश्वर मानतात . परंतु ज्ञानी मनुष्य जाणतो की परमेश्वर हा त्यांच्या सर्व अनंत शक्तिनी युक्त आहे. या कथेतून अपूर्ण ज्ञानामुळे होणारा गैरसमज आणि समग्र ज्ञानाचे महत्व पटवून दिले आहे.

2. वसईचा वेढा

प्रश्न 1:

1) अ) वर्तमानकाळ

2) ब) द्वितीया

3) क) सप्तमी

4) क) प्रत्यय नाहीत

5) ब) भूतकाळ

प्रश्न 2:

6) नौदल

7) विशेषनाम

8) रवि

9) सुख

प्रश्न 3:

10) 17 मे 1739 रोजी पेशव्यांनी वसईच्या किल्ल्यावर ताबा मिळविला.

11) चीमाजीअप्पाने वसईचा सरसुभा शंकराजी केशव फडके यांना सोपविला.

12) लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या संततिहीन पत्नीस तिच्या निर्वाहापुरता दिलेला पगार , जमिनी इत्यादी.

13) लढाईत मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी दिलेला बैठा पगार जमीन इत्यादी.

14) वसईवर फिरंग्यांचा अंमल होता.

15) वसईचा किल्ला घेण्यासाठी आप्पासाहेबांनी तीन वर्षे प्रयत्न केले.

16) वसईमध्ये नऊ लाखाचा मुलुख होता.

17) शिवाजी महाराजांच्या वेळी बहिर्जीनाईक हा उत्तम हेर होता.

18) शर्थिन राज्य राखलं या पुस्तकांचे लेखक कॅप्टन बेलवलकर हे आहेत.

19) चिमाजीअप्पा कोकणपट्टीला स्वारीला निघाले

20) वसईचा किल्ला ठाणे जिल्ह्यातील वसई येथे होता.

21) फिरंग्याची बायको देखणी व रूपवान होती.

22) किल्ल्यात खंडोजी मानकरने गुराख्याचे कार्य केले.

23) किल्ल्यात सुतारकाम करण्यासाठी आंजुरकर गेले होते.

24) किल्ल्यात दुल्लबाजी मोरे सरदारानी कासार कामाचे कार्य केले.

25) वसईचा किल्ला पोर्तुगीजानी 1536 मध्ये बांधला.

प्रश्न4:

- जिंकणे ,मिळविणे

– चिमाजीअप्पानी कोकणातील बरेच प्रदेश काबीज केले .

ब) -आव्हानदेणे ,आक्रमणकरणे

चिमाजी आप्पांनी वसईला जाऊन पोर्तुगिजांना शह दिला .

क) मिळविणे

चिमाजीअप्पांनी तीन वर्षे अथांग परिश्रमानंतर वसईचा किल्ला हस्तगत केला.

ड) ताब्यातदेणे, सुपूर्तकरणे

पोर्तुगीजांनी वसईचा किल्ला मराठ्यांच्या हवाली केला .

प्रश्न 5

26) चिमाजीअप्पांच्या सैन्यानी फिरंग्याच्या रूपवान बायकोला पकडून त्यांच्या समोर हजर केले .तेव्हा श्रीमंताने तिच्याकडे वाकडे नजरेने न पाहता उलट हिला कशाला धरून आणलात असे बोलून साडी चोळी देऊन सन्मानाने परत पाठविले.

27) आपल्या पत्नीच्या सांगण्यानुसार व एकूण परिस्थितीची जाणीव होऊन फिरंग्याने तह करण्याचे ठरविले. फिरंग्याने तहात असे सांगितले की, आमच्याकडे जे कारकून आहेत त्यांचा तुम्ही सांभाळ करावा आणि आम्हास आठ दिवसाची मुदत द्यावी म्हणजे आम्ही आमचा सरंजाम गोळा करून किल्ला तुमच्या हवाली करू व आमच्या प्रदेशात निघून जाऊ.

28. त्यावेळी त्यांनी सर्व सरदारांना एकत्र बोलावून असा निश्चय केला की, किल्ला मिळत नाही त्यामुळे मला तोफेच्या तोंडी बांधून माझे डोकेतरी किल्ल्यात पाडा अथवा किल्ला घ्या.

29) सर्व सरदारांनी चिमाजीआप्पास असे सांगितले की, श्रीमंत तुमचा जो निश्चय आहे तोच आमचाही आहे.पण किल्ल्यातील भेद (रहस्य) समजल्याशिवाय किल्ला हस्तगत होणे कठीण आहे. त्यासाठी प्रथम किल्ल्यातील गुपित शोधणे आवश्यक आहे.

30) तळेघोसाळे, अवचितगड, बिरवाडी हे किल्ले मराठ्यांनी सिंदी कडून जिंकून घेतले.

प्रश्न 6:

31) लढाईत जखमी झालेल्या लोकांना श्रीमंतांनी पालख्या व जमिनी इनाम म्हणून दिल्या. त्याच बरोबर युद्धात मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांच्या संगोपनासाठी पगार व विधवा झालेल्या स्त्रियांसाठी बैठा पगार व जमिनी दिल्या.

32) संदर्भ; वरील वाक्य वसईचावेढा या पाठातील असून या पाठाचे लेखक कृष्णाजी विनायक सोहनी हे आहेत.हे वाक्य चीमाजी अप्पांनी आपल्या सरदारांना म्हटले आहे.

स्पष्टीकरण – कोकणातील बराचसा भाग जिंकल्यानंतर चिमाजी अप्पानी वसईला वेढा घातला. तीन वर्षांनी सुद्धा त्यांना वसई जिंकता आली नाही. त्यावेळी चिमाजीअप्पानी रागाने निश्चयपूर्वक वरील वाक्य म्हटले आहे.

33) संदर्भ- वरील वाक्य वसईचा वेढा या पाठातील असून या पाठाचे लेखक कृष्णाजी विनायक सोहनी हे आहेत. हे वाक्य फिरंग्याच्या बायकोने फिरांग्याला उद्देशून म्हटले आहे.

स्पष्टीकरण- पेशव्यांनी वसईवर जोरदार चढाई केली. त्यावेळी फिरंग्याची बायको पळून जाऊ लागली, म्हणून तिला सरदारानी पकडले व सरकारांसमोर हजर केले, पण सरकारांनी तिला साडी चोळी देऊन परत पाठविले. ती किल्ल्यात गेली त्यावेळी आपल्या पतीला तिने हे वाक्य म्हटले आहे.

34) संदर्भ- वरील वाक्य वसईचा वेढा या पाठातील असून या पाठाचे लेखक कृष्णाजी विनायक सोहनी हे आहेत.हे वाक्य चिमाजीआप्पांना उद्देशून म्हटले आहे.

स्पष्टीकरण' - ज्यावेळी फिरंग्यांच्या बायकोने फिरंग्याला लढाई बंदीची विनंती केली त्यावेळी फिरंग्यांनी ही मान्य केली व पेशव्यांच्या बरोबर करार करण्यासाठी आपला एक मध्यस्थ (दूत) पाठविला त्यावेळी हे वाक्य म्हटले आहे.

प्रश्न 7:

35. प्रयत्नांती परमेश्वर

अर्थ—वरील कल्पनेत प्रयत्न केला असता आपल्याला परमेश्वर भेटतो असे म्हटले आहे इथे प्रत्यक्ष परमेश्वर नसून आपल्या कार्यामध्ये यश हे मिळते तसा अर्थ आहे.

स्पष्टीकरण- माणूस बसता भाग्य झोपते, चालता पुढे झेप घेते,ते प्रयत्नांचे रूपांतर होते भाग्य माझीया निच्छयाने अस संततुकडोजी महाराजांनी म्हटले आहे श्रमाने मातीचेही सोने होते आणि श्रमावाचून सोन्याचीही माती होते कारण प्रयत्नांती परमेश्वर अस तो म्हणून "केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे" असे समर्थ रामदास म्हणतात.उदाहरण- असे प्रसंग अनेक महापुरुषांच्या जीवनात घडले आहेत.1) एडिसनने विद्युत दिव्याचा शोध लावला होता ,पण त्यासाठी त्यांनी अथक परिश्रम केले. जवळ जवळ 99 वेळा त्यांचे प्रयत्न फसले होते. पण हार न मानता तो प्रयत्न करतच राहिला व शंभराव्या वेळी त्याच्या प्रयत्नांना यश मिळाले. 2) अशा तऱ्हेचे प्रयत्न डॉक्टर आंबेडकरांनी शिक्षणासाठी केले होते ते तर 21 तास वाचत म्हणजे या वरून प्रयत्नाने आपल्या कार्याचे फळ मिळतेच हे खरे.

प्रश्न 8:

36) चिमाजीआप्पांनी कोकणातील काही मुलुख जिंकून तेथे आपले वर्चस्व वाढविले. आणि पुढील प्रदेशावर सुद्धा ताबा मिळवावा या हेतूने वसईला येऊन पोहोचले. पण वसईच्या किल्ल्यावर पोर्तुगीजांचे वर्चस्व होते संपूर्ण किल्ला हा पाण्यात असून फक्त एकच अंग खुष्कीला होते. त्यामुळे आक्रमण करणे कठीण होते. प्रथम आपासाहेबांनी जहाजे तयार करून आरमारांच्या सहाय्याने लढाई केली, पण त्यात त्यांना यश आले नाही. पण चिमाजी अप्पांचा किल्ला घेण्याचा पक्का निश्चय होता, त्यामुळे किल्ल्यातील भेद समजण्यासाठी सरदारानी वेगवेगळे वेश परिधान करून किल्ल्यात प्रवेश केला व किल्ल्यातील भेद समजल्यावर वसईला चारही बाजूने वेढा घातला. असे अनेक प्रयत्न चिमाजी अप्पाने वसईचा किल्ला घेण्यासाठी केले.

37) वसईच्या किल्ल्यावर वर्चस्व स्थापन करण्यासाठी किल्ल्यातील रहस्येचा उलगडा करणे आवश्यक होते. यासाठी सरदारानी विचारपूर्वक काही युक्त्या आखल्या त्याप्रमाणे तीन सरदारांनी महत्त्वाची कामगिरी केली. खंडोजी माणकर यांनी गुराख्याचे काम पत्करून रोज किल्ल्यातील लोकांची गुरे चारावयास न्यावीत, आणि फिरून येऊन पावती करावी. दुसरे अंजुरकर पंचकळशे यांनी लोकांच्या घरोघरी जाऊन सुतारकाम करण्याचे ठरविले तर दुल्लबाजी मोरे यांनी कासाराचा धंदा पत्करून किल्ल्यातील बायकांस बांगड्या भराव्यात. त्याप्रमाणे तिघांनी ही उत्तमपणे काम केले व किल्ल्यातील रहस्य लोकांच्या कडून समजून घेतली नंतर आक्रमण केले.

38. वसईचा किल्ला जिंकण्यासाठी चिमाजी आप्पांनी तीन वर्षे प्रयत्न केले पण किल्ला हस्तगत झाला नाही यानंतर ची माइया पाने सर्व सरदारांची बैठक बोलावून किल्ला जिंकण्याचा निश्चय केला आणि किल्ला जिंकण्यासाठी वसईच्या किल्ल्यातील गुप्त माहिती मिळवण्यासाठी तीन सरदारांची निवड केली खंडोजी मानकर अंजुरकर पंचकर्षे आणि दुल्हाबाजी मोरे खंडोजी मानकर यांनी गुराखी म्हणून किल्ल्यात जाऊन किल्ल्यातील लोकांची गुरे चाराव्यास न्यायची आणि परत फिरून किल्ल्यात पोच करायची चाकरी पत्करली दुसरे सरदार अंजुरकर पंचकर्षे यांनी सुतार म्हणून किल्ल्यातील लोकांच्या घरी जाऊन सुतार काम करण्याची चाकरी पत्करली तिसरे सरदार दुल्लभाजी मोरे यांनी कासार पण पत्करून किल्ल्यातील बायकांना बांगड्या भरण्याचे काम अशाप्रकारे तिन्ही सरदाराने हेर म्हणून किल्ल्यातील मुख्य दरवाजे मुख्य बुरुंज शत्रूंचे मुख्य ठिकाणे शत्रूंचा शस्त्रसाठा अशी गुप्त माहिती मिळवली आणि किल्ला जिंकण्यासाठी अत्यंत मोलाचे योगदान दिले

3.विद्यार्थ्यांनो जागृत व्हा!

प्रश्न 1

1) ड) सत्+आचार

2) ब) नि:+ चल

3) ब) नि: +अक्षर

4) अ) नत्र तत्पुरुष

5)) अ) कर्मधारय

6) ब) यशासाठी सिद्धी

7) अ) द्विगु समास

8) क) विसर्ग संधी

9) क) कर्मधारय समास

10) ड) षष्ठी तत्पुरुष

11) अ) समाहार द्वंद्व

प्रश्न 2 रा

12) वैचारिक लेख

13) लिहिता वाचता येणारा

14) व्यक्तिमत्व विकास

15) विडंबन

16) बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय घटनेचे शिल्पकार असे म्हणतात.

17) स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात बाबासाहेब आंबेडकर हे कायदामंत्री होते.

18) विद्यार्थ्यांनो जागृत व्हा या पाठाचा वाडमय प्रकार वैचारिक लेख आहे.

19) विद्यार्थ्यांनो जागृत व्हा! या पाठाचे मूल्य शिक्षण प्रेमहेहोय.

20) विद्या ही महासागरासारखी आहे.

21) जेव्हा माणूस पुस्तकावर प्रेम करेल तेव्हाच तो विद्येचा पुजारी होईल.

22) आंबेडकर 21 तास अभ्यास करत होते.

23) आंबेडकरांचे दुसरे दैवत विनय हे होतं.

24) आंबेडकरांच्या जवळ वीस हजार पुस्तके होती.

25) आत्मविश्वासाच्या जोरावर आंबेडकरांनी अनेक संघटना तोंड दिले होते.

26) शीला शिवाय शिकलेले लोक निपजू लागले तर राष्ट्राचा नाश होतो.

27) आंबेडकरांचे मते शिक्षणापेक्षा अधिक महत्त्व शिल या गुणालाआहे.

28)आंबेडकरांचे तिसरे दैवत शील

प्रश्न 4

29) विद्येला आंबेडकर पहिले दैवत म्हणतात विद्या ही महासागरासारखी आहे कारण विदेश व माणसाला शांतता नाही आणि माणुसकी ही नाही. जशा गंगा ,यमुना ,ब्रह्मपुत्रा, गोदावरी नद्या सागराला जाऊन मिळाल्या की त्यानंतर त्या नद्यांचे पाणी कोणते हे वेगळे काढून दाखविता येत नाही.तशी विद्या असावी ज्याप्रमाणे माणूस जगायचं असेल तर अन्नाची आवश्यकता असते तशीच विद्येचीही आवश्यकता असते ज्ञाना शिवाय माणूस काहीही करू शकणार नाही विद्या ही सर्वांनी अवगत केली पाहिजेत विद्या हे शस्त्र आहे ती तलवारी सारखी आहे परंतु तिचे महत्त्व तिला धारण करण्यावर अवलंबून राहील म्हणूनच आंबेडकर म्हणतात की विद्या ही खूप मोठी अफाट आहे. ती महासागरासारखी आहे.

30) आंबेडकरांचे ध्येय असे होते की माझं पोट भरलं पाहिजे आणि माझ्या लोकांची सेवा झाली पाहिजे .त्यासाठी त्यांनी कष्ट सुचले पोयवाडीच्या नाक्यावरच्या छोट्याशा खोलीत कन्या भात व भाकरी खाऊन आपल्या समाजाची सेवा केली परंतु संधी मिळत असूनही भारी पगाराच्या नोकरीकडे ते वळले नाहीत.

31) अनेक संकटांना आंबेडकरांनी आत्मविश्वासाच्या जोरावर तोंड दिले आत्मविश्वासाला ते दैवी शक्ती मानत आपल्या जीवनात आलेल्या सर्व प्रकारच्या संकटांना त्यांनी आत्मविश्वासा च्या जोरावरच तोंड दिले . मी जे करीन ते होईल असे ते म्हणत असत ते आपल्या आत्मविश्वासाच्या बळावरच, छोट्याशा खोलीत राहून सर्व सुविधांचा अभाव असतानाही आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले होते.

32) संदर्भ : प्रस्तुत गद्य ओळ विद्यार्थ्यांनो जागृत व्हा !या पाठातून घेतलेली असून या पाठाचे लेखक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे आहेत .

स्पष्टीकरण : कष्टातील सातत्य व निरंतर प्रयत्न याचे महत्व विद्यार्थ्यांना सांगताना आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना उद्देशून वरील वाक्य उद्गारले आहे. ते म्हणतात की इंग्लंडमधील जो अभ्यासक्रम पूर्ण करण्यास आठ वर्षे लागतात तो मी केवळ दोन वर्ष आणि तीन महिन्यात पूर्ण केला त्यासाठी दिवसातील 21 तास मी अभ्यास केला. ते म्हणतात की आजही चाळीसी उलटून गेली तरी 18 तास खुर्चीत बसून काम करण्याची क्षमता माझ्याजवळ आहे. पण त्यासाठी तपकीर किंवा सिगारेट यांचा आधार मला घ्यावा लागला नाही किंवा त्याची गरजही त्यांना भासली नाही म्हणूनच त्यांना असे वाटते की दीर्घोधोग व कष्ट करण्यानेच यश प्राप्ती होते.

33) संदर्भ - प्रस्तुत गद्य ओळ विद्यार्थ्यांनो जागृत व्हा या पाठातून घेतलेले असून या पाठाचे लेखक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे होत.

स्पष्टीकरण: किती वेदना आणि त्रास सोसून आपण विद्या संपादन केली हे सांगतानाच आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना उद्देशून वरील वाक्य उद्गारले आहे. ते म्हणतात की दहा बाय दहाच्या डिपार्टमेंटच्या चाळीमध्ये राहून कन्या भात खाऊन एका पैशाच्या घासलेच्या तेलावर मी अभ्यास केलेला आहे.

34) डॉ. बाबासाहेब आंबेडकर परिचय

पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर 1891 ते 1956 स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात कायदेमंत्री घटनेचे शिल्पकार दलितांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण करणारे क्रांतिकारक महापुरुष ज्यांनी आयुष्यभर ज्ञानसाधना करून कायदेशास्त्र ,अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी ज्ञान शाखावरती प्रभुत्व मिळवले दलितांच्या उन्नतीसाठी आपलं जीवन समर्पित केलं भारत सरकारने त्यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानीत केले .मूकनायक ,जनता या नियतकालिकेचे संस्थापक होते . थॉट्स ऑफ पाकिस्तान, बुद्ध अँड हीज धम हे ग्रंथ लिहिले.

35) हा रूपक अलंकार आहे.

लक्षणे- : उपमेय व उपमान हे भिन्न नसून ते एकच आहेत अशा प्रकारचे वर्णन ज्या वाक्यामध्ये आलेले असते.

36) हा उपमा अलंकार आहे.

लक्षणे-: दोन भिन्न वस्तू मधील सुंदर साधर्म्य . उपमेय हे उपमानासारखे आहे .असे वर्णन या वाक्यात आले आहे सारखा हा साम्यवाचक शब्द येथे आला आहे.

दोन वस्तूतील सारखेपणा दाखवला आहे.

37) हा व्यतिरेक अलंकार आहे.

लक्षणे–: जेव्हा कोणत्याही काव्यात उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे दाखविले जाते तेव्हा तेथे व्यतिरेक अलंकार होतो.

38) आंबेडकर विद्येला आपले पहिले दैवत मानतात. ते म्हणतात विद्या ही महासागरासारखी आहे कारण विधे शिवाय माणसाला शांतता नाही आणि माणुसकी नाही जसे गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, गोदावरी नद्या सागरला जाऊन मिळाल्या की त्यानंतर त्यांचे पाणी कोणते हे वेगळे काढून दाखवता येत नाही तशी विद्या असावी कारण माणूस जगायचं असेल तर अन्नाची आवश्यकता असते तशीच विद्येची आवश्यकता असते. ज्ञाना शिवाय माणूस काहीही करू शकत नाही विद्या ही सर्वांनी अवगत केली पाहिजे विद्या हे एक शस्त्र आहे ती तलवारी सारखी आहे परंतु तिचे महत्त्व तिला धारण करणाऱ्या वर अवलंबून असते.असे विद्येबद्दल आंबेडकरांचे विचार आहेत.

39) आंबेडकरांनी अपार वेदना आणि त्रास सोसुन विद्या संपादन केली. विद्येचे महत्व समजल्यामुळे त्यांनी तिला आपले पहिले दैवत मानले. ज्याप्रमाणे माणूस जगायचं असेल तर अन्नाची आवश्यकता असते तशीच विद्येची आवश्यकता असते विधे शिवाय माणसाला शांतता नाही माणुसकी नाही शिक्षण घेताना पाठ्यपुस्तकासाठी पैसे नसत एक वेळ उपाशी राहून ते पुस्तक घेत असत पोयवाडीच्या दहा- बाय दहाच्या छोट्या खोलीत राहून एका पैशाच्या घासलेट तेलावर दिवा लावून त्यांना अभ्यास करावा लागला. चिमणीच्या प्रकाशात त्यांनी अभ्यास केला. दहा बाय दहाच्या एका खोलीत आई वडील भावंडे कुटुंबासह राहत होते प्रसंगी कन्याभात व भाकर खाल्ली आणि समाजाचे सेवा केली पण भारी पगाराच्या नोकरीकडे ते वळले नाहीत. इंग्लंडमध्ये असताना ज्या

अभ्यासक्रमाला आठ वर्षे लागतात तो अभ्यासक्रम त्यांनी दोन वर्ष तीन महिन्यातच पूर्ण केला .दिवसाचे एकवीस तास अभ्यास करत असत .सतत विद्येची त्यांनी परिश्रमाने पूजा केली एक वेळ उपाशी राहून त्यांनी वीस हजार पुस्तके खरेदी केली . अशा प्रकारे अनेक परिश्रम आणि त्रास सोसुन आंबेडकरांनी विद्या संपादन केली होती.

40) जीवनात विद्येपेक्षा शील खूप महत्त्वाचे आहे असे आंबेडकर म्हणतात विद्येबरोबर आमच्यात शील पाहिजेत शिलाशिवाय विद्या व्यर्थ आहे असे त्यांना वाटते एखाद्या जवळ विद्येचे शस्त्र असेल व तो शीलवान असेल तर त्यायोगे तो एखाद्याचे संरक्षण करेल जनतेचे कल्याण करेल .परंतु एखाद्याजवळ शील नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुसऱ्याचा घात करेल अडाणी माणूस कोणाला फसवू शकत नाही परंतु शिकलेल्या माणसाकडे फसविण्याचा युक्तिवाद असतो लबाडी करण्यास चातुर्य व बुद्धी लागते परंतु त्याला सदाचाराची अर्थात शिलाची जोड मिळाली तर तो लबाडी फसवणुक करू शकणार नाही म्हणून शिकल्या सवरलेल्या लोकांत शिलाची अत्यंत जरुरी आहे शिलाशिवाय शिकलेले लोक जन्माला येऊ लागले तर समाजाचा राष्ट्राचा नाश होतो म्हणून आंबेडकराना वाटते की शिक्षणापेक्षा शिलाची किंमत अधिक आहे.

प्रश्न 5 41) कल्पनाविस्तार

- ग्रंथ हेच गुरु

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा 'अशी गुरुची महती आहे गुरुशिवाय कुठलेही ज्ञान प्राप्त होत नाही. मनुष्य जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत अनेक गोष्टी शिकत असतो आणि वेळोवेळी त्याला अनेक गुरु मिळत असतात. पण हेच ज्ञान आपण ग्रंथाच्यातुन घेत असतो ग्रंथ म्हणजेच ज्ञानाचे भांडार ते आपल्याला शहाणपणाचे धडे देतात आणि योग्य मार्ग दाखवितात ग्रंथामधून मिळणारे मार्गदर्शन हे गुरूंच्या शिकवणी की सारखेच असते म्हणूनच संत तुकारामांनी म्हटले आहे 'वाचावे ग्रंथ जगावे ज्ञान 'ग्रंथ वाचनामुळे माणसाचा दृष्टिकोन विकसित होतो. ग्रंथ ग्रंथ आपल्याला वेगवेगळ्या प्रेरणा देणारे असतात महात्मा गांधीजींनी म्हटले आहे ही चांगले पुस्तक म्हणजे 'आपल्या आत्म्याला अन्न 'आहे याचाच अर्थ ग्रंथ वाचनामुळे मनाला शांती मिळते आणि नवीन उमेद येते. ग्रंथ वाचनामुळे आम्ही भूतकाळातील गोष्टी अनुभवतो वर्तमान आणि भविष्याची स्वप्न आम्ही ग्रंथ वाचनाने पूर्ण करू शकतो. अनेक धर्मग्रंथ वाचून आपण घडलो आहे आणि हेच धर्मग्रंथ आमचे गुरु आहेत.

- वाचाल तर वाचाल

जीवनात यश सन्मान व ओळख मिळवण्यासाठी शिक्षण खूप उपयुक्त आहे व शिक्षणात एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे पुस्तके असतात. कारण पुस्तके आपल्याला ज्ञान देतात.पुस्तके आपले चांगले मित्र असतात पुस्तके वाचनाने ज्ञान आणि सोबत मनोरंजन सुद्धा होते. महान लेखक फ्रासईस बेक्कन यांनी म्हटले आहे की 'वाचन हे व्यक्तीला पूर्ण करते' पुस्तकाने ज्ञान मिळते व ज्ञानाने आत्मसन्मान वाढतो बाबासाहेब आंबेडकरांनी वाचनाच्या जोरावरतीच इतकं महान कार्य केलं आणि ते महापुरुष बनले आजच्या चाट -जीपीटी च्या जमान्यामध्ये मुलांना वाचनाचा छंद लावणे अत्यंत महत्वाचे आहे वाचनाचा छंद हा लहानपणापासूनच जोपासला पाहिजे पालकांनी आपल्या मुलांना वाचनाचे महत्त्व समजावून त्यांच्या वाचनाची गोडी निर्माण करायला हवी.

प्रश्न 6

42 आंबेडकरांच्या जीवनात विद्या हे पहिले दैवत आहे ते म्हणतात की विद्या ही प्रत्येक व्यक्तीने अवगत केली पाहिजेत अनेक त्रास सुसून आंबेडकरांनी विद्या संपादन केली होती त्यांना विद्येचे भयंकर वेड होते ते विद्येची पुजारी असून 24 तास विद्येची पूजा करत असत त्यामुळे विद्येबद्दल त्यांच्या जीवनामध्ये एक वेगळ्याच प्रकारचे महत्त्व होतं

विनय बद्दल आंबेडकर म्हणतात की विनय हे त्यांचे दुसरे दैवत आहे त्यांनी कधी कोणाकडे याचना केली नाही .विनयशील पणे अगदी नम्रपणे आपल्या समाजाची सेवा केली आपल्या ज्ञानाच्या जोरावरती त्यांनी कधी कुणाला फसवलं नाही कुणाकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षा ठेवली नाही

ज्ञानाचा उपयोग समाजासाठी झाला पाहिजेत समाजाची सेवा झाली पाहिजेत हाच त्यांचा एकमेव उद्देश होता आणि म्हणून समाजाच्या उन्नतीसाठी विद्यार्थ्यांमध्ये लोकांमध्ये विनय असणं हे अत्यंत महत्त्वाचं आहे असे त्यांनी विनया बद्दल सांगितलं होतं विनय नसलेल्या व्यक्ती हा आपल्या ज्ञानाचा जोरावरती समाजाचा नाश करू शकतो तर त्याच ठिकाणी विनय आणि शील असलेला व्यक्ती हा समाजाचा उद्धार करू शकतो.

आत्मविश्वासाबद्दल ते म्हणतात की आत्मविश्वास ही एक दैवी शक्ती आहे आत्मविश्वासाच्या जोरावर करू शकतो असे त्यांना वाटते .आत्मविश्वासाच्या जोरावरच त्यांनी शिक्षण पूर्ण केले शिवाय आपल्या आयुष्यात आलेल्या अनेक संकटांचा सामनाही केला विद्येबरोबर शील ,चारित्र्य हे त्यांनी महत्त्वाचे मानले त्यामुळेच व्यसनापासून ते लांब राहू शकले प्रत्येक व्यक्तीमध्ये आपलं कार्य पूर्णत्व करण्यासाठी आत्मविश्वासाची फार गरज असते हे त्यांनी सांगितले.

43. आंबेडकरांनी या पाठातून विद्यार्थ्यांना विद्या,विनय,आत्मविश्वास आणि शील या गोष्टींचे महत्व पटवून दिले आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन विद्या संपादन करावी आणि जागृत व्हावे, कर्तव्यनिष्ट व्हावे असा संदेश दिला आहे. विद्यार्थ्यांनी नम्रपणे समाजाची सेवा करावी. संकटांना न घाबरता सामोरे जावे अशी शिकवण ते देतात. त्याचबरोबर आत्मविश्वास ही दैवी शक्ति असून यामुळे काहीही संध्या करता येते. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वास ठेवावा. त्याचबरोबर प्रत्येक इसमात शील असले पाहिजे असे आंबेडकर म्हणतात. कारण शीलाशीवाय विद्या फुकाची आहे. म्हणून प्रत्येक माणूस शीलवान असला पाहिजे. तरच राष्ट्रांचा उद्धार होईल असा संदेश आंबेडकरांनी या पाठातून दिला आहे

44 . आंबेडकरांनी शील या गोष्टीला खूप महत्व दिले आहे. कारण शील ही मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. शिक्षण घेण्याबरोबर प्रत्येक माणसात शील(चारित्र्य) असणे आवश्यक आहे. शीलाशीवाय विद्या व्यर्थ आहे. शील नसेल तर नुसती विद्या ही पशूच्या हातातील तलवारी सारखी अतिशय घातक ठरू शकते. शिकलेल्या व्यक्तीकडे शील नसेल तर तो आपल्या बुद्धीचा वापर दुसऱ्यांना फसविण्यासाठी करू शकतो. ज्ञानाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी व्हावा यासाठी माणसाचे शील शुद्ध असले पाहिजे. म्हणून आंबेडकरांनी शील या गोष्टीला महत्व दिले आहे.

प्रश्न 7

45 निबंध लेखन

निबंधाचे नाव

वाचनाचे महत्त्व

विद्यार्थी जीवनात सदाचाराचे महत्त्व

*प्रस्तावना / विषय प्रवेश. — 01

* स्पष्टीकरण —-- 02

* समारोप/ उपसंहार —------ 01

* भाषा शैली. —-- 01

एकूण. 05

4. नोकर ? छे ! मालक

प्रश्न 1 ला

1) ब चतुर्थी तत्पुरुष

2) ब षष्ठी तत्पुरुष

3) क समाहार द्वंद्व

4) ब षष्ठी तत्पुरुष

5) अ शून्य असा पंजर

6) व शेजारी पाजारी व इतर लोक

7) ड षष्ठी तत्पुरुष

8) ड तृतीया

9) क माध्यम पद् लोपी समास

10) अ विघ्नांमध्ये संतोष मानणारे

11) व मध्यम पदलोपी समास

प्रश्न 2 रा

12) उभयान्वयी अव्यये

13) जाया

14) पाक्षिक

15) सामान्य नाम

प्रश्न 3 रा

16) बापाची पेंड पुस्तकाचे लेखक द .मा .मिरासदार हे होत .

17) नोकर? छे मालक! हा पाठ आणखी चिमणराव या पुस्तकातून घेतला आहे .

18) पत्नीची मदत घेऊन लेखकाने स्वयंपाक केला .

19) काकूबाई रामेश्वर दर्शनाला गेल्या होत्या .

20) काकूंनी सोहळ्यात लोण्याचा डबा लपून ठेवला होता .

21) बोक्याने आपली एकादशी पोपटावर हल्ला करून मोडली

22) चिमणराव आणि गुंड्या भाऊ हे दोन मानसपुत्र ची .वी जोशी नी लोकप्रिय केले.

23) नोकर? छे !मालक या पाठाचे मूल्य स्वभाव दोष किंवा विनोद निर्मिती .

24) लेखकांच्या कुत्र्याचे नाव वसंत होते .

25) बुधवारी काकूबाई लेखकांच्या मुलांकरिता नाटकाचे फुकट पास आणण्यासाठी गेल्या .

26) कुत्र्याला तरी घालून द्यावे अथवा काकूंना तरी कायमची रजा द्यावी असा निर्वाणीचा संदेश दिला .

27) निरंजन बुवांच्या मठात काकूंना संगीत काकू असे म्हणत होते .

28) लेखकांच्या द्वितीय पुत्राचे नाव रघुनाथ असे होते .

29) मोरू, राघू, मैना, ही लेखकांच्या मुलांची नावे आहेत .

30) काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्या पाजाऱ्यांना वाटले की लेखकांचा द्वितीय पुत्र रघुनाथ राघू कैलासवासी झाला की काय?

प्रश्न 4 था

31) ची. वी .जोशी यांचा परिचय

पूर्ण नाव चिंतामण विनायक जोशी 1892 ते 1963 हे सुप्रसिद्ध मराठी विनोदी लेखक पुणे येथे त्यांचा जन्म झाला त्यांना पाली भाषेचा विशेष व्यासंग होता सुरुवातीच्या काळात शिक्षण खाद्यात माध्यमिक शिक्षक नोकरी पुढील नोकरीच्या निमित्ताने बडोदा येथे वास्तव्य केले पाली इंग्रजी आणि मराठी विषयाचे अध्यापन 1928 नंतर बडोदा सरकारचे दप्तरदार म्हणून काम केलं 'सविचार' या नियतकालि चे संपादक होते. एरंडाचे गुराळ, चिमणरावाचे चराट ,पुन्हा एकदा चिमणराव ,ओसाडवाडीचे देव, वायफळाचा मळा इत्यादी विनोद कथासंग्रह त्यांनी लिहिले .चिमणराव आणि गुंड्याभाऊ हे दोन मानसपुत्र त्यांनी आपल्या साहित्यातून लोकप्रिय केले होते .

32) संदर्भ – सदर वाक्य नोकर ?छे! मालक या विनोदी कथेतील असून लेखक चिंतामण विनायक जोशी हे आहेत. ही कथा आणखी चिमणराव या पुस्तकातून संपादित करून घेतली आहे. हे वाक्य मैना ने काकूंना उद्देशून म्हटले.

स्पष्टीकरण : रात्रीच्या वेळी स्वयंपाक न करता बाहेरून आलेल्या काकूंनी पेटी घेऊन भजन सुरू केले तेव्हा सर्वांनी पाकगृहाच्या दरवाजात उभे राहून ते पाहिले तेव्हा काकूबाईनी लेखकांना सांगितले रोज रात्री घटकावर भजन करण्याची चाल आहे माझी तुम्हाला त्रास होत असेल तर मी मनातल्या मनात करीन तेव्हा वैतागून मैनाने वरील वाक्य त्यांना उद्देशून म्हटले आहे .

33) संदर्भ : सदर वाक्य नोकर ?छे! मालक या पाठातून घेतलेले असून या पाठाचे लेखक चिंतामण विनायक जोशी हे आहेत ही विनोदी कथा आणखी चिमणराव या पुस्तकातून संपादित करून घेतलेली आहे. हे वाक्य लेखकांच्या पत्नीने काकूंना उद्देशून म्हटले आहे .

स्पष्टीकरण : घरातील कामे करण्यासाठी आणलेल्या काकू पहाटेच उठून तुळशीबागेत काकड आरतीला गेल्या होत्या आठच्या सुमारास त्या घरी परतल्या व मैनाला माझ्यासाठी चहा ठेवला की नाही? असे विचारायला लागल्या तेव्हा लेखकांच्या पत्नीने चिडून त्यांना हा प्रश्न विचारला आहे.

34) संदर्भ : सदर वाक्य नोकर? छे !मालक या विनोदी कथेतून घेतलेल्या असून या कथेचे लेखक चिंतामण विनायक जोशी हे आहेत ही कथा आणखी चिमणराव या पुस्तकातून संपादित केलेली आहे हे वाक्य काकूंनी आपल्या विटू बोक्याला उद्देशून म्हटले आहे .

स्पष्टीकरण : लेखकांच्या वसंत नावाच्या कुत्र्याने काकूंच्या विटू बोक्यावर हल्ला केला हे पाहण्यासाठी मुले गोळा झाली तो गोंगाट ऐकून लेखकाना सांगत असलेला एकादशीचा कार्यक्रम बाजूस ठेवून आपल्या शरीराचा तोल सांभाळत काकूबाई धावत ओसरीवर आल्या व त्यांनी वसंताच्या तावडीतून बोक्याची सुटका केली आणि त्या बोक्याला कुरवळीत काकूने वरील वाक्य म्हटले आहे .

35) घरी आलेल्या वयस्कर बाईला पाहून मुले आजीबाई आल्या आजीबाई आल्या म्हणून ओरडु लागली त्यावेळी रागावून काकू म्हणाल्या काय बाई चावट पोर आहेत ही! मी काय म्हातारी बितारी आहे काय ?आजीबाई म्हणून घ्यायला मला काकू म्हणत जा ;जर का आजीबाई म्हटलं तर जळता निखारा लावीन जिभेला .

36) घरातील सर्वजण बसले असता काकू आले आणि म्हणाल्या उद्या एकादशी आहे माहित आहे ना ?तर त्यानंतर काकूंनी एकादशीसाठी दाणे, साबुदाणे, खजूर, दूध इतके पदार्थ मागविले आणि उलट असे म्हणायला लागल्या की एकादशी नि दुप्पट खाशी अशातली माझी गत नाही .

37) लेखक व त्यांचे कुटुंबीय जेवण करण्यासाठी बसले असताना भात खाण्यात त्यांचे लक्ष आहे असे पाहून काकूंनी तपकिरीची डबी बाहेर काढली आणि त्यातील चिमूटभर पूड नाकपुड्यात कोंबली दोन पळांनी अक्शी असा आवाज काढून त्यांनी जो फवारा उडविला त्याच्या योग्य भाजी पोळ्या आणि भात या सर्व अण्णांवर उदक सिंचन झाले अर्थातच वाढलेल्या अन्नाशिवाय आणखीन अन्न खाण्याची त्यांना कोणालाच इच्छा झाली नाही त्यामुळे ते सर्वजण अर्धपोटीस ताटावरून उठले.

38) स्वयंपाक घराच्या दारात उभे राहिल्यावर लेखकास दिसले की काकूंनी आपला बिछाना पसरला होता समोर बाजाची पेटी घेऊन त्या ती वाजवण्यात आणि गायनात गर्क होऊन गेल्या होत्या .त्यांच्या खांद्यावर त्यांचा आवडता पोपट विराजमान झाला होता आणि बोकोबा मालकिणीला खेटून पहुडला होता.

39) खालील वाक्प्रचाराचा अर्थ म्हणून वाक्यात उपयोग करा

विराजमान होणे = गादीवर बसणे

- महाराज सिंहासनावर विराजमान झाले.

हेलपाटा होणे =नाहक ये जा करावे लागणे

- गल्लीतील लोकांना हेलपाटा पडला .

40) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा

कैलासवासी होणे = मृत्यू होने

- लोकांना लेखकांचा पुत्र रघुनाथ कैलासवासी झाला असे वाटले.

आकांत मांडणे = जोर जोराने रडणे

- रागू गेल्याने काकुणी आकांत मांडला.

41) खालील वाक्प्रचार अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा

- राम राम ठोकणे = कायमचा निरोप देणे
  लेखकाने काकूंना कायमचा रामराम ठोकला.

आकाश पातळ एक करणे = जोर जोराने ओरडणे

अपघात ग्रस्त पुत्राला पाहून मातेने आकाश पातळ एक केले.

42)

मना सज्जना तुकडेनेच जावे

वृत्त — भुजंगप्रयात

अक्षरे —- 12

गण —--- य य य य

यती — आठव्या अक्षरावर

प्रश्न 5 वा चार- पाच वाक्यातील उत्तरे

43) लेखकांच्या घरी काकू ठरवलेल्या दिवशी सकाळी आठच्या सुमारास बैलांच्या छकड्यातून दाराशी आल्या छकड्यात दोन ट्रंका आणि सतरंजित बांधलेली छानदार वळकटी बैठकीवर बांधलेली होती पुढच्या ट्रंकावर लाकडी चौकटीत बसवलेला पाण्याचा खुजा आणि मधल्या वळकटीवर बाजाची पेटी आणि मागल्या ट्रंकावर आजीबाई विराजमान झाल्या होत्या. त्यांनी पोपटाचा पितळी पिंजरा घट्ट धरून ठेवला होता व डाव्या बगलेत आवळून धरलेल्या बोक्याची डोके त्या डाव्या हाताने कुरवळीत होत्या अशाप्रकारे लेखकांच्या दरात काकूंचे आगमन झाले.

44) लेकरांच्या घरातील सर्व मंडळी दुपारी बसले होते अचानक काकू तेथे आल्या आणि म्हणायला लागल्या उद्या एकादशी आहे माहित आहे ना? लेखकांनी म्हटलं की आम्हाला एकादशी नाही पण काकूंनी उत्तर दिले तुम्हाला नाही पण मला आहे आणि यानंतर काकू नी एकादशीसाठी शेंगदाणे ,साबुदाणे, खजूर ,दूध इतके जिन्नस मागवायला सांगितले त्याचबरोबर त्या म्हणायला लागल्या माझी काही एकादशी आणि दुप्पट खाशी अशातली गत नाही. एकंदर काकूंनी हे सर्व जिन्नस मागवले आणि आपली एकादशी केली.

45) काकड आरती होऊन परत आल्यानंतर काकू मैनाकडे चहा मागू लागल्या त्यावर लेखकांच्या पत्नीने काकूंना आम्ही तुम्हाला कामाला ठेवलं आहे की तुम्ही आम्हाला ?असा प्रश्न केला तेव्हा काकू म्हणाल्या की अहो काऊ ताई देव धर्माला कसला तुमचा अडथळा उलट माझ्या काकड आरतीचं अर्ध पुण्य तुम्हाला लागेल त्यातून

मला तुमच्या इथं परक असं मुळीच वाटत नाही मग मैना कडून घोटभर चहा मागितला तर त्यात काय बिघडलं .मी तिला आपल्या नातीसारखी समजते अशा प्रकारे काकू काऊ ताईना समजावू लागल्या.

प्रश्न 6

46) लेखकाने आपल्या सौभाग्यवतीची प्रकृती बिघडल्यामुळे स्वयंपाक करण्यासाठी एका वयस्कर बाईची निवड केली परंतु घरात आल्यापासून त्या स्वतः मालकिणीसारख्या वावरत होत्या त्यांच्या वागण्याला सार्वजन कंटाळले होते स्वतः काम करण्याऐवजी घरातील सर्व लोकांकडून त्या काम करून घेत होत्या घरातील सर्व लोकांना काम लावत होत्या आपला वेळ त्या देवपूजेत भजनात घालवत होत्या घरातील लोण्याचा डबा तिने चोरून गाठोड्यात लपवून ठेवला होता .इतर गोष्टीपेक्षा त्यांना आपल्या विटू बोक्याचे व राघू पोपटाचे ममत्व होते त्यामुळे ज्या दिवशी काकूंच्या बोक्याने दुधाच्या पातेल्यात तोंड घातले आणि मोरु ने त्याच्या पाठीत क्रिकेटची एसटी जोराने घातली तेव्हा काकूंनी आकाशपाताळ एक केलं एकंदर काकूंचे घरातील वागणे हे नोकरासारखे नव्हते तर मालकासारखे होते त्यामुळे लेखनाच्या घरातील सर्व मंडळी त्यांना कंटाळून गेली आणि झालेल्या दिवसाचा पगार देऊन त्यांनी त्यांना कायमचा रामराम ठोकला.

47. लेखकांच्या पत्नीची तब्येत अचानक बिघडल्यामुळे घरात स्वयंपाक करण्यासाठी एका वयस्कर बाईची लेखक निवड करतात. त्या बाईना सर्वजण काकू म्हणत असतात प्रत्यक्षात काकू नोकर म्हणून लेखकांच्या घरी कामाला आलेल्या असतात पण त्या काम चुकार असतात. स्वतः काम न करता लेखकांच्या घरातील मंडळींनाच काम सांगतात. सकाळ- संध्याकाळी देवाधर्माचे कारण सांगून कामाच्या वेळी बाहेर जात असतात. त्यांना गायन आणि भजनाची सवय असल्यामुळे बराचसा वेळ त्या त्यात घालवत असतात घरातील कामापेक्षा त्यांना आपल्या पोपटाची आणि बोक्याची जास्त काळजी असते लेखकांच्या घरातील साहित्य चोरून सोहळ्यात लपून ठेवत असतात. उलट लेखक आणि त्यांच्या पत्नीलाच कामे सांगत असतात अशा प्रकारे एकंदरस काकूबाईचा स्वभाव आळशी कामचुकार आणि स्वार्थी असतो.

प्रश्न 7

48) निबंध

माझे आजोबा

प्रस्तावना / विषय प्रवेश - 01

स्पष्टीकरण. - 0 2

समारोप /उपसंहार – 01

भाषा शैली. 01

एकूण. 0 5

5. मनाचे पिंजरे

प्र. 1 ला

1) ब प्रश्नचिन्ह

2) क असफल

3) अ मनस्ताप

4) ड. अव्ययीभाव समास

5) ब. प्रथमा

प्रश्न 2 रा

6) स्वर संधी

7) भावे प्रयोग

8) राणी

9) विशेष नाम

10) श्री चक्रधर स्वामी

प्रश्न 3 रा

11) लेखक छत्री वापारण्यच्या विरुद्ध होता

12) पारिस्तीतीचे पिंजरे तोडून टाकले पाहिजेत

13) स्वतःच्या घरापासून

14) छत्री छप्पर मुर्दाबाद अर्थात छत्री बंद

15) अनंत आत्माराम काणेकर

16) व्यक्तिमत्व विकास

17) चित्रा व आशा

18) लघु निबंध

19) धुक्यातून लालताऱ्या कडे

20)उघड्या खिडक्या

21)बारा रुपयाला

22)120 दिवस

23)जुन्या बाजारातील दुकानातून

24. चित्रा आणि आशा.

प्रश्न 4 था

25) पावसाळ्याच्या सुरुवातीला छत्री विकत घ्यावी म्हणून लेखक जुन्या बाजारात गेले दुकानदाराने त्यातल्या त्यात बऱ्यापैकी दोन-तीन स्वस्तातील छत्र्या दाखवल्या . पण जेव्हा लेखकाने एकदम फाटलेली छत्री निवडली त्यावेळी दुकानदाराला आश्चर्य वाटले

26.चांगल्या किमतीच्या दरातील छत्र्यांची निवड न करता लेखकाने बारा रुपयाची छत्री निवडली तेव्हा दुकानदाराला आश्चर्य वाटले कारण ती छत्री फाटलेली होती म्हणून लेखकाला तो दुकानदार छत्री घेऊ नका असे म्हणत होता .

27) पावसाळ्यात छत्री नसताना जर आपण चाललो तर काय भिजत चाललाय का छत्री नाही वाटतं अशा प्रकारचे अनेक प्रश्न लोक आपणास विचारतात किंवा कोण हा वेडा अशा अर्थाने टकमक बघतात म्हणून आपण छत्री वापरतो अर्थात छत्री आपण दुसऱ्यासाठी घेतो असे लेखक म्हणतो.

28 सामाजिक आर्थिक व राजकीय असे हर एक तऱ्हेचे मनाचे पिंजरे आहेत ज्यामध्ये मानवी व्यक्तिमत्त्वाचा विकास कमी होत आहे. आणि हे पिंजरे तोडून टाकण्यासाठी आपण आपल्या घरापासून प्रयत्न केले पाहिजे .

29) लेखक परिचय

पूर्ण नाव अनंत आत्माराम काणेकर कालखंड 1905 ते 1980 संपादक चित्रा व आशा या साप्ताहिकांचे संपादक ,लघुनिबंध शिंपले आणि मोती, ,पिकली पाने तुटलेल तारे ,

प्रवासवर्णने धुक्यातून लाल ताराकडे, आमची माती आमचे आकाश ,कथासंग्रह जागत्या छाया ,मोरपिसे,रुपेरी वाळू नाटकनिशिकांताची नवरी 1957 च्या औरंगाबाद येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषवले .

प्रश्न 5 वा

30)संदर्भ वरील वाक्य मनाचे पिंजरे या पाठातून घेतलेले असून या पाठाचे लेखक अनंत कानेकरआहेत. हा ,पाठ उघड्या खिडक्या या लघु निबंध संग्रहातूनघेतलेला आहे.

स्पष्टीकरण: पावसाळ्यापूर्वी एखादी छत्री खरेदी करावी या हेतूने लेखक जुन्या बाजारात गेले, लेखकाने कमी किमतीच्या फाटक्या छत्रीची निवड केली त्यावेळी हे वाक्य दुकानदाराने लेखकांना उद्देशून म्हटले आहे .

31)संदर्भ वरील वाक्य मनाचे पिंजरे या पाठातून घेतले असून या पाठाचे लेखक अनंत काणेकर आहेत हा पाठ उघड्या खिडक्या यालघु निबंधसंग्रहातून घेतलेला आहे .

स्पष्टीकरण : लेखकानी एवढ्या कमी दरातील बारा रुपयाची छत्री निवडल्यानंतर दुकानदार आश्चर्यचकित होऊन वरील वाक्य त्यांनी लेखकांना उद्देशून म्हटले आहे .

32)संदर्भ: प्रस्तुत वाक्य मनाचे पिंजरे या पाठातून घेतलेले असून या पाठाचे लेखक अनंत काणेकर हे आहेत हा पाठ उघड्या खिडक्या या लघु निबंध संग्रहातून घेतलेला आहे .

स्पष्टीकरण : परिस्थितीचे पिंजरे तोडून टाकल्याशिवाय मानवाची मुक्ती होत नाही त्याप्रमाणे याजागतिक क्रांतीचाही प्रारंभ मनाचे पिंजरे तोडून टाकण्यापासून व्हावा हे उत्तम. मोठमोठी माणसे मोठ मोठ्या क्रांत्या करत आहेत म्हणून आपण ही क्रांती करायची असल्यास वरील वाक्याप्रमाणे परिस्थितीचे पिंजरे मुर्दाबाद म्हणून क्रांती केली पाहिजे .

प्रश्न 6 वा

33)पावसाळा अंदाजे चार महिने म्हणजे 120 दिवस चालतो त्यापैकी फार तर साठ दिवस पाऊस पडतो म्हणजे उरले साठ दिवस त्यातून तीस दिवस तरी रात्री पडतो राहिले 30 दिवस तोही काही सारखा पडत नाही आपण घरी असताना किंवा कामावर असताना निदान पंधरा दिवस तरी पावसाचे जातात. म्हणजे फक्त पंधराच उरले थोडा झिमझिम पाऊस असला तर जाता येता कुठेतरी झाडाखाली किंवा एखाद्या कोपऱ्यात पाच मिनिटे थांबून आपण सहज न भिजतात घरी जाऊ शकतो असे सात दिवस तरी जातात ..आता आठ च दिवस राहिले आपण जायला - यायला आणि जोराचा पाऊस पडायला असा योगायोग फार तर चार वेळा येतो अशा प्रकारे लेखकाने पावसाळ्याचा हिशेब घातला आहे .

34. अनंत काणेकर यांनी मनाचे पिंजरे या पठातून आधुनिक मानवाची वैचारिक व मानसिक कोंडी अतिशय प्रभावीपणे मांडली आहे. परिसतिथीच्या अदृश्य पिंजऱ्यात अडकून मानवाचे व्यक्तिमत्व कसे संकुचित आणि खुरटत चालले आहे. आधुनिक मानवाचे आयुष्य ठराविक चाकोरीत अडकलेले आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत माणूस एका ठरलेल्या चक्रात जगतो हीच परीसतिथि एका पिंजऱ्यासारखी बनते. पिंजऱ्यात अडकलेल्या पक्षाची उडण्याची क्षमता हळूहळू कमी होते. तसेच रोजच्या संघर्षात माणसाची स्वतंत्र विचार सारणी खुरडत राहते. तो समाजाच्या प्रवाहाबरोबर वाहत जातो. भौतिक सोई आणि सुविधा आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या पिंजऱ्यात तो अडकलेला आहे. बाह्य जगात तो यशस्वी दिसत असला तरी आतून त्याचा मानसिक व आत्मिक विकास खुंटला आहे. परिसतिथीशी सतत तडजोड केल्यामुळे त्यांचे व्यक्तित्व पूर्ण विकसित न होता खुरडत चालले आहे.

35. या लघु निबंधातून विविध अंगी मानवी प्रवृत्ती आढळून येते वस्तू घेताना त्याचा मला कितपत फायदा होणार आहे किंवा नाही याचा ताळमेळ घालतानाच ती वस्तू त्याशिवाय तत्सम अनेक वस्तू स्वतःसाठी घेत नसून दुसऱ्यांसाठीच घेत असतो पण माणसाने स्वतःपुरता पहावे इतरांचा विचार करू नये दुसऱ्याच्या सुखासाठी थोडं दुःखही पचवायला तयार असणारी मानवी प्रवृत्ती स्वतःच्या जीवाचा कोंडमारा सहन करत नाही इतरांनी केलं तेच आपण करायचं याला मानवी मन आक्षेप घेते हे परिस्थितीचे पिंजरे आहेत थोडं बंड करून हे पिंजरे तोडून टाकावेत स्वतःपासूनच परिवर्तनाला सुरुवात करावी पावसाळ्यात मोजून चार वेळा आपल्याला छत्रींचा उपयोग होतो पण ती घेऊनही भिजतोच योग्य अयोग्य लाभ नुकसान याच गणित सोडवताना आपलं म्हणणं पटवून देणारी मानवी प्रवृत्ती येथे दिसून येते

प्रश्न 7 वा

36) निबंध लेखन

अंधश्रद्धा एक शाप

प्रस्तावना /विषय प्रवेश – 1 भाषाशैली

विषय स्पष्टीकरण – 2 समारोप — 1

.

37)पत्रलेखन

व्यवहारिक पत्र

पत्रलिहिणाऱ्याचे नाव व पत्ता –1

पत्राचा मायना व मजकूर — 2

पत्राचा शेवट — 1

भाषा शैली— 1

38) वृत्त

वृत्ताचे नाव वसंत तिलका

अक्षरे. 14

गण. त भ ज ज ग ग

यती. आठव्या अक्षरावर

6. जपानी स्त्री

1 ब साप शिडी

2 ड प्रवास वर्णन

3 अ टीप

4 क अधोगती

5 ड सोशालिस्ट

6 पूर्वेच्यापरिसरात

7 बॉम्ब हल्ला

7 हाऊसवाईफ

8 नम्र

9 षष्ठी तत्पुरुष समास

10 जपानी स्त्री गोड प्रेमळ नम्र व हसरीआहे

11 जपानी स्त्री सामाजिक आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात पुढारलेली आहे

12 जपानी स्त्रिया ट्रेम कंडक्टर ,बस कंडक्टर दु कानातील विक्रेत्या हॉटेलमधील वाढपी लिफ्टमन आणि बुट पॉलिश व केस कापणे अशाप्रकारे जपानी स्त्रिया काम करतात.

13 स्वत:चे जीवनमान उंचावण्यासाठी कोणती लाज न बाळगता कोणतेही काम केले पाहिजे अशी जपानी स्त्रियांची श्रद्धा आहे.

14 लग्नाआधी आपल्याकडे कपडे धुवायचे यंत्र टेलिफोन टेलिव्हिजन या सर्व गोष्टी घरात असलेल्याच पाहिजे असा जपानी स्त्रियांचा हट्ट अ सतो.

15 लेखिकेने कमीजखाना या तरुण मुलींना अशी एकटी राहायची भीती वाटत नाही का ?असा प्रश्न विचारला .

16 जपानी तरुण मुली नोकरी न करता घरात बसू लागल्या तर त्यांची चेष्टा होते

17 जपानमधील सर्वात महत्त्वाच्या दोन संस्था आहेत त्या म्हणजे मदर्स युनियन व हाऊसवाइफ

18 हाऊस वाइफ या संस्थेची स्थापना 1948 साली झाली .

19 घराचा आधार नष्ट झाल्यावर जपानी लोकांना स्वतःच्या पायावर उभे राहावं लागलं

20 हाऊसवाइफ या संस्थेच्या शाखा २०७ आहेत

21 गृहिणी मंडळाची लाकडी खुण म्हणजे लाकडी हात होय

22 जपानी स्त्री या पाठाचे मूल्य कुतूहल हे होय

23 जपानी स्त्री हा पाठ पूर्वीच्या परिसरात या प्रवास वर्णनातून घेतला आहे.

24 मदर्स युनियनच्या अध्यक्षा 70 ते 75 वर्षाच्या

25 मीना प्रभू

प्रश्न 4

27 स्त्रियांचे जीवन सामाजिक आर्थिक आणि राजकीय यासारख्या क्षेत्रात पूढारलेलेअसून तेथील स्त्रिया ट्रेन कंडक्टर बस कंडक्टर दुकानातीलविक्रेत्याहॉटेलमधीलवाढपीलिफ्टमनआणित्यांच्याबरोबरबूटपॉलिशआणि केस कापण्याचाधंदासुद्धाकरतात

28. जपानमध्ये रस्त्यात उगीच चघोटाळ्यात उभेराहून मुलींची चेष्टा करणं किंवा त्यांना काही त्रास देणं असले निरर्थोंगी प्रकार आढळ तनाहीत उलट मुली नोकरी न करता घरात बसू लागल्या तर त्यांची चेष्टा होते .

29. रात्रीच्यावेळी सुद्धा जपानी स्त्रिया रेल्वेच्या डब्यात कॅन्टीन चालवतात हॉटेल चालवणे कप विसळणे डब्यात जेवणाचे कागदी डबे विकणे वगैरे काम अतिशय निर्भयपणे करतात.

30 1819 साली झालेला भूकंप आणि हिरोशिमा वर 1945 साली झालेला बॉम्ब हल्ला या दोन महा भयानक संकट जपान वर ओढावली या दोन धक्क्यात त्यांची घरे उध्वस्त झाली अनेक लोक अनाथ झाले आणि आधारच नाहीसा झाला या गोष्टी जपानच्या प्रगतीला कारणीभूत होत्या.

31. लेखिका टोकियोमधील एका फॅशनेबल हॉटेलमध्ये क्लबच्या पार्टीत गेल्या असता तिथे राजकन्या प्रसिद्ध नटी गायिका कवयित्री कादंबरीकार लघुकथा लेखिका अशा स्त्रिया आल्या होत्या.

32 परिचय नाव इंदू दिनकर साक्रीकर कालखंड 1923 1963 या सामाजिक कार्यकर्त्या आणि कथा लेखिका होत्या कथा संग्रह निळाई अपूर्ती मोहर एकांकिका संग्रह सापशिडी पूर्वेच्यापरिसरात या प्रवास वर्णनातून निवडलेला आहे साहित्यप्रकार प्रवासवर्णन मूल्य कुतूहल

33 प्रस्तुत अवतरण जपानी स्त्रि या पाठातील असूनहा पाठ इंदू साक्रीकर यांनी लिहिलेलाआहे प्रस्तुत पाठ पूर्वेच्या परिसरात या प्रवास वर्णनातून निवडलेला आहे जपानचा प्रवास करताना रात्रीच्या गाडीतूनसुद्धा अतिशय निर्भयपणाने काम करणाऱ्या 18- 19 वर्षाच्या मुलींना पाहून सोशालिस्ट पक्षाच्या एका प्रभावी कार्यकर्त्या मिसेस कमीजखा ना लेखिकेने प्रश्न केला की असं रात्री अपरात्री चे काम करण्यास या स्त्रियांना भीती नाही वाटत? या प्रश्नाचे उत्तर देताना कमीज खा ने लेखिकेला वरील वाक्य उद्देशून म्हटले आहे.

34 संदर्भ प्रस्तुत अवतरण जपानी स्त्री या पाठातील असून हा पाठ इंदू सक्रीकर यांनी लिहिला आहे प्रस्तुत पाठ पूर्वीच्या परिसरात या प्रवास वर्णमातून घेतला आहे हे वाक्य.कमीज कानेलेखिकेला उद्देशून म्हटले आहे

.स्पष्टीकरण : लेखिका मनोमनीच विचार करू लागल्या की हिंदू स्त्रियांपेक्षाअगदीमागेघोषातराहणारवावरणाऱ्या या जपानीस्त्रियाइतक्या कशा पुढल्यातेव्हाजपानमध्येझालेल्याबॉम्बहल्ल्यानंतरस्वतःच्यापायावरउभेराहण्याखेरीज दुसरा कोणताच पर्याय नव्हता हे सांगतानावरील वाक्य म्हटलेआहे

35. प्रस्तुत अवतरण जपानी स्त्री या पाठातीलअसूनहा पाठ हिंदू सादरीकरणलिहिलाआहे प्रस्तुत पाठ पूर्वेच्यापरिसरात या प्रवास वर्णनातूनघेतलेलाआहेस्पष्टीकरण टोकियोमधील एक फॅशनेबलहॉटेलमध्येक्लबच्या पार्टी निमित्त कमी जगाच्यासोबत लेखिका गेल्याहोत्या उपस्थित असलेल्या सर्व स्त्रिया प्रतिष्ठित होत्यात्यामध्ये एक राजकन्या होती त्यांचीतोंडओळखकरून घेताना त्यांचा नम्रपणा लेखिकेला भारावतो हे सांगताना लेखिका वरील वाक्य म्हणतात

36 वाक्यप्रचाराचा अर्थ समूह वाक्यात उपयोग करा

नाश होणे.

प्रश्न 6 वा

37.कमीजखवाच्या समवेत झालेले स्त्रियांच्या क्लब पार्टीसाठी लेखिका टोकियोओमधील एका फॅशनेबल हॉटेलमध्ये गेल्या. तिथे प्रतिष्ठित पुरुष मंडळी हजर होती मनोरंजनासाठी मध्यभागी पिंगपागसारखं खूप मोठं लाकडी लांबट टेबल होतं दोन्ही कोपऱ्यात झगमगीत प्रकाशात मोठ मोठे कॅमेरे स्टैंडवर उभे केले होते .लाऊड स्पीकर होता टेबलावर अनेक खाद्यपदार्थ कलापूर्ण पद्धतीने मांडले होते हजर असलेल्या सर्व स्त्रिया प्रतिष्ठित होत्या जेव्हा कमीजाखानी राजकन्याशी लेखिकांची ओळख करून दिली तेव्हा राजकन्या म्हणून त्यांच्या वागण्या बोलण्यात कोणताच गर्वकिंवा दिमाख नव्हता असे वर्णन लेखिकेने केले.

38. एका मोठ्या तीन मजली इमारतीत मदर्स युनियन ही संस्था आहे पहिल्या मजल्यावर मदर्स युनियनच ऑफिस आहे दुसऱ्या मजल्यावर पालकांची संस्था आणि तिसऱ्या मजल्यावर शिक्षकांच्या संघटनेचा ऑफिस या संस्थेच्या अध्यक्षा 70 ते 75 वर्षाच्या होत्या मात्र त्यांच्या चेहऱ्यावर अलौकिक तृप्ती होती नावावरून ही संस्था केवळ मातांची मार्गदर्शक असेल असे वाटते पण 1945 मध्ये जेव्हा हिरोशिमा वर बॉम्ब हल्ला झाला तेव्हा अनेक घर जमिनदोस्त झाली कित्येक संसार धुळीला मिळाले देशातील तरुण पुरुषांची संख्या कमी झाली आणि दीनवणी मुलं दारोदार हिंडू लागली त्या मुलांना आश्रय देण्याच्या हेतूने या संस्थेची स्थापना झाली.

प्रश्न 7.वा

39. जपानी स्त्री पाठाच्या आधारे जपानी स्त्री ही लाघवी शालीन हसरी आणि प्रेमळ आहे. भाषेत बोलता आले नाही तरी ती हसऱ्या डोळ्यांनी स्वागत करते. जपानी स्त्री ही विणेशील आणि नम्र आहे. तसेच ती कष्टाळू आहे. कोणतेही काम करण्यास ती लाजत नाही. ती शिस्तप्रिय आणि व्यक्तशीर आहे. ती सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात पुढारलेली आहे. ती मदतीची भावना असणारी आहे. लोकांना मदत करण्यास ती नेहमीच तत्पर असते. ती संधि माणमिळवू प्रसन्न आणि आटमसिद्ध स्वभावाची आहे. स्वताचे जीवनमान उंचावण्यासाठी ती अनेक

गोष्टीत कार्यरत असते. स्वताच्या लग्नाचा पैसा ती स्वता जमा करते. संकटाक्या वेळी ती धैर्याने आणि शांततेने वागते. तिच्यात मानवतेची आणि अतिथि सत्काराची भावना दिसून येते.

40. जपान मधील दोन संस्था पैकी दुसरी महत्त्वाची संस्था म्हणजे हाऊस वाईव्हज या संस्थेची स्थापना 1948 साली झाली मातीमोल होत चाललेल्या राष्ट्राच्या संरक्षणासाठी पुढे आलेली ही गृहिणी मंडळाची संस्था स्वतः वर्गणी जमा करून या संस्थेने सहा मजली इमारत बांधली या इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर एकेक विषयाचा वर्ग चालतो पुष्परचना हस्तव्यवसाय आहारशास्त्र गृह रचना स्वयंपाक यांचे वर्ग तिथे चालतात दैनंदिन जीवनातील बाजारहाट कसा करावा बजेट कसं तयार करावं याचं शिक्षण ही दिल जात या इमारतीत असलेल्या प्रयोग शाळेत कोणत्याही वस्तूत भेसळ असली की ती वस्तू कसून तपासली जाते व जर का भेसळ आढळली तर ती वस्तू विकणाऱ्या विक्रेत्यावर बहिष्कार टाकला जातो अशा प्रकारे इतक्या जबरदस्त ताकदीने तयार झालेल्या या संस्थे समोर सरकारही चळाचळाकापून उठतं अशा या संस्थेच्या 207 शाखा आहेत.

41 .हा पाठ वाचून कोणाच्याही मनात जपानी स्त्रीबद्दल अभिमान निर्माण होईल कारण जपानी स्त्री जशी गोड प्रेमळ हसऱ्या स्वभावाची तशी सामाजिक आर्थिक व राजकीय जीवनातील पुढारलेली तेथील सर्व कारभार जणू स्त्रियांच्याच हाती असतो तरुण मुली स्वतःच्या लग्नासाठी स्वतः पैसा जमा करतात व त्यासाठी त्या कोणतेही काम करण्यासाठी लाजत नाहीत रात्रीसुद्धा अतिशय निर्भयपणाने या स्त्रिया काम करीत.असतात मातीमोल होत चाललेल्या आपल्या देशाच्या संरक्षणासाठी खंबीरपणे अस्तित्वात आलेल्या दोन संस्था सुद्धा स्त्रियांनीच स्थापन केल्या समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य त्या सातत्याने करीत असतात निरुद्योग हा एक आजार असून देशावर आलेल्या दोन नैसर्गिक आपत्तीने त्यांना जगण्यास शिकवलं असे त्या म्हणतात. जपानी स्त्रियांच्या कर्तुत्वाचा आढावा यातून व्यक्त होतो..

प्रश्न 8

42. पत्रलेखन___ कौटुबिंक

पत्र लिहीता-याचा पत्ता___ 1

त्मायना व मजकुर__ 2

पत्राचा शेवट_____ 1

भाषा शैली____ 1

प्रश्न 9 वा

43. निबंध

माझीअविस्मरणीयसहल

प्रस्तावना _____1

स्पष्टीकरण _ 2

समारोप__ 1

भाषाशैली__ 1

7. हिरवे सांगाती

1 क) तरु

2 ब)धरती

3 अ) रवी

4 ड) सोबती

5 ड) सप्तमी

6 ब) उद्गारवाचक

7 अ) पद्मभूषण

8 कवी

9 वृक्षप्रेम

10 परिणय + आतूर

11 नो

प्रश्न 2 एका वाक्यात उत्तरे

12 गुलजार यांचे पूर्ण नाव संपूरनसिंग कालरा

13 हिरवे सांगाती या पाठाचा साहित्यप्रकार ललित लेख

14 हिरवे सांगाती पाठाचे मूल्य वृक्षप्रेम होय.

15 हिरवे सांगाती हा पाठ ऋतुरंग दिवाळी अंकातून घेतला आहे.

16 पृथ्वीवर जन्माला आलेला पहिला जीव म्हणजे वनस्पती होय.

17 लेखकांचे बालपण दिल्लीतील रोशनआरा या गल्लीत गेले.

18 पुरातन वृक्ष म्हणजे पिंपळ

19 जांभळाचे झाड. लेखकांना आजोबाप्रमाणे वाटते

20 झाडांच्या संगतीत लेखकाला एकाच कुटुंबातले आहोत असे वाटते.

21 बांबूच्या वनातील शीळ हे साई साई म्हणते असे लेखकास वाटते.

22 कडुलिंबाची पिवळसर फुले पाहून गुलजार यांना मिला है किसी का झुमका ठंडे ठंडे हरे नीम तले हे गीत आठवले.

23 पूर्वजांनी पिंपळाला देवाचे स्वरूप दिले आहे.

24 त्या झाडांशी बोलले पाहिजे ही बंगाली परंपरा आहे.

25 पांढऱ्या चाफ्याच्या झाडाला लेखकाने बडी मा म्हटले आहे.

26 तीन वेळा पपई दिल्यानंतर पपईचे झाड मरते

.27 वाटसरु ला त्याच्या छायेत डोके टेकता येईल म्हणून पिंपळाच्या झाडाला पार बांधला जातो

28 लेखक प्रवासाला पहाटेच्या वेळी निघतात.

29 गुलजाराना राखी या अभिनेत्रीने वृक्ष दिला .

30 बांबूंच्या वनांचा नाश होण्याची वेळ आली की तेव्हा बांबूला फुले येतात

31 माणूस झाडाप्रमाणे आहे.

प्रश्न ३रे दोन तीन वाक्यातील उत्तरे

32. या पृथ्वीस्थलावर पहिल्यांदा वनस्पती जन्माला आली ऊन पाऊस थंडी सावली उष्णता

या साऱ्याचा जसा झाडावर परिणाम होतो तसाच तो माणसावरही होतो आसपासच्या वातावरणामुळे स्वभाव बदलतो त्यामुळे झाडांशी आपला फार पूर्वीपासून कौटुंबिक नातं आहे म्हणूनच मनुष्य देखील एक झाड आहे असे लेखकास वाटते.

33 लेखक व त्यांचे मित्र लहानपणी पिंपळाच्या जांभळांच्या झाडाखाली विविध गमतीशी खेळ खेळत पिंपळाच्या पानांचा वापर करून कधी कुल्फीवाला तर कधी पान वाला बनवून कुल्फी विकणे का चुना लावलेले पानांचे विडे विकणे हे खेळ खेळत असत त्यांच्याबरोबर ते विटी दांडू व क्रिकेट खेळत.

34. जांभळाचे झाड विस्ताराने खूपच मोठे होते त्यामुळे त्या झाडाखाली भरपूर सावली मिळत होते दुपारच्या उन्हाच्या वेळी अनेक लोक जांभळाच्या सावलीत बसायचे सर्व मुले याच जांभळीच्या सावलीत खेळत असायची म्हणून लेखक जांभळाच्या झाडाला गारवा असे म्हणतात .

35. बांबूची लागवड एकदा केली तर बांबूची झाडे अनेक वर्षे बांबू देतात त्यामध्ये सातत्याने वाढत होत असते पण ठराविक काही वर्षानंतर ज्यावेळी या बामूंच्या वनांचा नाश होण्याची वेळ येते तेव्हा वामन आपले येतात असे लोक म्हणतात

36. लेखकाने आपल्या घरासमोरील छोट्याशा बागेत फाटका शेजारी गुलमोहरचे रोपटे लावले होते सुरुवातीला गुलमोहर अतिशय नाजूक असतो म्हणून त्याची वाढ होताना विशेष काळजी घ्यावी लागते लेखकानेही गुलमोहर बोलती छोटेसे कुंपण घालून त्याची काळजी घेऊन वाढ केली होती

37. राखीने भेटी दाखल दिलेले झाड लेखकाने आपल्या अंगणात लावले त्याने खत पाणी घातलं त्याची चांगली निघाली पण लेखक त्या झाडाची संवाद साधत नव्हते इतकच करत नव्हते म्हणून ते झाड वाढत नव्हते असे त्यांना वाटले

38. पानगळीच्या मोसमात झाडाची पाने गळतात व आपला हिरवा रंग टाकून लाल पिवळा केसरी रंग धारण करतात पानगळीच्या कालावधीत बहावा लाल आणि चिनार इतर वृक्ष मंडळी आपल्या पहाडी भागात अशी रंगांची दाटी करतात की रंगीबेरंगी कपडे घालून एखादी वरात चालली आहे असा भास होतो

39. बहावा ,अमलतास ,पपई ,गुलमोहर, पांढरा चाफा , चिनार ,वृक्ष राखीने दिलेले झाड. .

40. पुष्कळ कविता लिहिल्या आहेत मी झाडावर

संदर्भ: वरील वाक्य हिरवे सांगाती या पाठातील असून या पाठाचे लेखक गुलजार आहेत सविता दामले यांनी अनुवादित केलेला आहे आपण ऋतुरंग या दिवाळी अंकातून घेतलेला आहे.

स्पष्टीकरण: लेखकांना झाडाबद्दल आवड होती तुम्ही आपल्या बागेमध्ये झाडे लावली होती झाडाकडे पाहिलं तरी मन कसं उल्हासित होतं . असं त्यांचं म्हणणं होतं हे सांगताना लेखकाने वरील वाक्य म्हटले आहे

41. तो वृक्ष राखीचा आहे.

संदर्भ: वरील वाक्य गुलजार यांनी लिहिलेल्या हिरवे सांगाती या पाठातील असून हा पाठ ऋतुरंग या दिवाळी अंकातून घेतलेला आहे सविता दामले यांना पाठ संपादित केलेला आहे

स्पष्टीकरण: सुप्रसिद्ध अभिनेत्री राखी यांचे अतिशय चांगले मैत्रीचे संबंध होते राखीने त्यांना भेटीदाखल एक रोपटे दिले होते. व गुलजारानी लावले व काळजीपूर्वक वाढवले होते त्याचे वर्णन करताना लेखकाने वरील वाक्य म्हटले आहे.

42. झाडे चैतन्यशील असतात.

संदर्भ: वरील वाक्य हिरवे सांगाती या पाठातील असून या पाठाचे लेखक गुलजार आहेत हा पाठ ऋतुरंग या दिवाळी अंकातून निवडलेला असून सविता दामले यांनी तो अनुवाद केलेला आहे.

स्पष्टीकरण: लेखकांना लहानपणापासूनच झाडाबद्दल खूप प्रेम आहे अनेक झाडांवरती त्यांनी कविता केलेले आहेत झाडाकडे पाहिलं तरी मन कसं उल्हासित होतं म्हणजेच झाडांच्या बद्दल आपल्या जीवनातील स्थान सांगताना लेखकाने वरील वाक्य संबोधले आहे

43. गुलजार यांचे पूर्ण नाव संपूरन सिंग कालरा 1936 हे कवी गीतकार नाटककार चित्रपट निर्माते दिग्दर्शक आहेत त्याने हिंदी व उर्दू भाषेत लेखन केलेले आहे चाळीस वर्षाहून अधिक काळ चित्रपट सृष्टीसाठी लेखन केले आहे मेरे अपने आंधी मौसम परिचय इजाजत इत्यादी चित्रपटांसाठी गीत लेखन केलेला आहे त्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे हिंदी उर्दू कुसुमाग्रज की सुनी सुनी नगमे या नावाने अनुवाद केला आहे 2002 साली साहित्य अकादमी पुरस्कार 2004 साली पद्मभूषण पुरस्कार 2013 साली दादासाहेब फाळके पुरस्कार मिळालेला आहे

44. पिंपळ आणि जांभूळ या झाडा बद्दलच्या आपल्या लहानपणीच्या अनेक आठवणी लेखकाने सांगितल्या आहेत लेखकांचे बालपण दिल्लीत रोषण आरा येथे गेले पिंपळाच्या आणि जांभळाच्या झाडाखाली खेळून ते मोठे झाले होते. अनेक वाटसरू पिंपळाच्या झाडाखाली दोन घटका थांबून विश्रांती घेत असत पिंपळाच्या झाडाखाली लेखक लहानपणी अनेक खेळ खेळायचे. त्यांचा आवडता खेळ म्हणजे पिंपळाची पाने गोळा करायची आणि खेळायचे ले मलाई बर्फ ले मलाई बर्फ अशाप्रकारे ओरडत लेखक खोटाखोटा कुल्फीवाला होत असत. तसेच पानांचे दुकान हा ही लेखकांचा आवडता खेळ असायचा पिंपळाच्या पानांना खोटा खोटा कात व चुना लावून पानांचे विडे तयार करायचे. जांभळाच्या झाडाबद्दल सुद्धा लेखकांच्या अनेक आठवणी आहेत दिल्लीत भर दुपारी खूप ऊन असते पण या उन्हात ते जांभळाच्या झाडाखाली खेळायला यायचे जांभळाच्या झाडाखाली खेळतोय असे सांगितले तर आई दुपारी खेळायला सोडायची जांभळाचे झाड म्हणजे त्यांना आजोबा सारखेच वाटायचे. त्या झाडाखाली ते निर्धास्त खेळायचे. ते झाड खूप मोठे पसरलेले होते. त्यामुळे दोन्ही हात वर करून जणू आशीर्वाद देत उभे राहिल्यासारखे वाटत होते. गल्लीतील अनेक लहान मुलेबाळे त्याचबरोबर वयस्कर माणसे या झाडाखाली विसावा घेत असत.

IV प्रश्नांची उत्तरे

45. सुरुवातीला या पृथ्वीतलावर जन्माला आलेला जीव म्हणजे वनस्पती होय व त्यानंतर हळूहळू उत्क्रांती होऊन लाखो वर्षांनंतर ज्याप्रमाणे ऊन वारा पाऊस या सर्वांचा झाडावर परिणाम होतो तसाच तो माणसावरही होतो आस पासच्या वातावरणामुळे माणसाच्या स्वभावात सुद्धा बदल होत असतो. त्याचा रक्तदाबही बदलतो म्हणून माणूस हा झाडासारखा. आहे असे लेखक म्हणतात.

46. लेखक म्हणतात की झाड म्हणजे आपली दोस्त मंडळीच त्यांच्या लहानपणी त्यांच्या घराच्या बाजूला एक जांभळा चे झाड होते लेखकांच्या मनात अनेक आठवणी आहेत लेखक लहानपणी त्या जांभळाच्या झाडाच्या छायेत खेळत खेळत मोठे झाले आहेत ते झाड म्हणजे त्यांच्या लहानपणीचा गारवा होता त्या झाडाखाली खेळणं म्हणजे आजोबांच्या जवळ खेळतोय असं त्यांना वाटत होतं ते झाड अतिशय पसरलेलं होतं सावलीत विसाव्याला आलेल्या लोकांना जणू ते आशीर्वाद देत होतं.

47. लेखकांच्या बागेमध्ये अनेक प्रकारची झाडे होती. त्यापैकी पांढऱ्या चाफ्याचा एक वृक्ष होता लेखक त्या पांढऱ्या चाफ्याच्या वृक्षाचे गुणधर्म सांगतात की त्या झाडाची कोणतीही फांदी किंवा पान तोडले तर त्याच्यातून दुधासारखा चीक बाहेर पडतो म्हणून लेखकाने त्या झाडाला बडी मा असं म्हटलेलं आहे त्या झाडाची आणखी एक गंमत म्हणजे झाडाला फुले येतात तेव्हा पान गायब होतात व पानं आली फुले गायब होतात असा लपंडाव चाललेला असतो .

48. पानगळी चा मोसम जेव्हा सुरू होतो तेव्हा जंगलात एक वेगळीच अनुभूती आपणास येते या मोसमा मध्ये झाडाची सर्व हिरवी पाने गळून पडतात झाडांना नवीन पालवी फुटते व वेगवेगळ्या रंगांची त्या ठिकाणी उधळण झालेली दिसते लाल पिवळा केशरी हिरवा रंगांची पाने येतात हे बघताना भान हरपून जाते चिनार वृक्ष अशी रंगांची दाटी करतात की रंगीबेरंगी कपडे घालून कुठली तरी वरात चालली आहे असा भास होतो असे मनोहर दृश्य आपल्याला पानगळीच्या दिवसात दिसते.

प्रश्न 5 कल्पनाविस्तार

- 49. **ग्रंथ हेच गुरु**

ही एक मराठी म्हण आहे ज्याचा अर्थ ग्रंथ हेच गुरु असा होतो

या म्हणीचा भावार्थ असा आहे की ज्याप्रमाणे गुरु आपल्याला ज्ञान देतात आणि मार्गदर्शन करतात त्याचप्रमाणे पुस्तके ग्रंथ देखील आपल्याला ज्ञान देतात योग्य मार्ग दाखवतात आणि आपले विचार समृद्ध करतात म्हणजेच ग्रंथा मधून आपल्याला इतके ज्ञान मिळते की ते एका गुरु सारखेच काम करतात ही कल्पना आजच्या डिजिटल युगातही तितकीच प्रासंगिक आहे कारण ज्ञानाचे आणि मार्गदर्शनाचे सर्वात मोठे स्तोत्र आजही ग्रंथच आहेत

निष्पक्ष मार्गदर्शक आहेत पुस्तकांमुळेच व्यक्तिमत्व विकास आणि जीवनदृष्टी बदलते

थोडक्यात सांगायचं तर ग्रंथ हेच गुरु म्हणजे केवळ एक वाक्य नाही तर ते ज्ञानाप्रती आदर शिकवण्याची वृत्ती आणि जीवनातील प्रगतीचा मंत्र आहे. ज्याला ग्रंथाचे महत्व कळले त्याने आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा गुरु ओळखला.

- **वृक्षवल्ली आम्हा सोयरे**

याचा अर्थ निसर्गाशी आपले नाते वृक्षवल्ली आम्हा सोयरे या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळीत निसर्गाशी मानवाचे असलेले अतूट नाते आणि मैत्री किती सुंदर रित्या मांडली आहे हे दिसून येते ही केवळ एक साधी ओळ नसून निसर्गप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा आणि त्यांच्याशी एकरूप होण्याचा संदेश देणारा एक जीवनमंत्र आहे सुखदुःखात सोबत राहतात त्याप्रमाणे वृक्ष देखील आपल्याला अनेक गोष्टी सुखदुःखामध्ये देतात ,

म्हणून थोडक्यात वृक्षवल्ली आम्हा सोयरे हे शिकवण आपल्याला निसर्गाकडे केवळ एक संसाधन म्हणून न पाहता त्याला आपला जिवलग मित्र आणि नातेवाईक मांडण्यात प्रबोध करते निसर्गाचे महत्त्व ओळखून त्याचे संवर्धन करणे कारण आपले आणि पुढील पिढ्यांचे भविष्य याच नात्यावर अवलंबून आहेत .प्रश्न 7 वा अलंकार

50. झाडे म्हणजे आमची दोस्त मंडळीच

वरील वाक्यात रूपक हा अलंकार आहे

लक्षणे: उपमेय व उपमान यात एकरूपता आहे ते भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असते तिथे रूपक अलंकार होतो

51. जांभळाच्या झाडाजवळ खेळताना जणू आजूबाजूवच खेळतोय असे वाटते

वरील वाक्यात उत्प्रेक्षा हा अलंकार होतो

लक्षणे: उपमेय हे जणू उपमान आहे अशी कल्पना करणे याला उत्प्रेक्षा अलंकार म्हणतात

52. कडुलिंबाची छोटी छोटी फुले म्हणजे झुमकेच

वरील वाक्यात रूपक अलंकार आहे

लक्षणे: उपमेय व उपमान यात एकरूपता आहे ती भिन्न नाहीत असेच ते वर्णन असते तेथे रूपक हा अलंकार होतो

53. चंद्र ही पिकल्या पानासारखा टपकन हिरवळीवर पडेल

वरील ओळीत उपमा अलंकार आहे

लक्षणे: दोन वस्तू मधील साम्य जेथे चमत्कृती पूर्ण रीतीने जिथे वर्णन केलेले असते ते उपमा अलंकार होतो

प्रश्न 8 सात-आठ वाक्यात उत्तरे

54. गुलजार हे मुळातच झाडांवर प्रेम करणारा माणूस झाडांचे वर्णन अतिशय वैशिष्ट्य पूर्ण केले आहे पिंपळाचे वर्णन करताना ते म्हणतात की हा पुरातन वृक्ष आहे आणि त्याचे बरेचसे औषधी गुण आहेत जांभळात जांभळाच्या वृक्षाबद्दल ते म्हणतात हा वृक्ष म्हणजे एक प्रकारचा गारवाच आहे बांबूच्या वनात जर वाऱ्याचा झोत आला तर बांबूची झाडे साई साई असे देवाचे नाव घेतात कडुनिंबाचे झाडाची फुले म्हणजे त्यांना झुमके असे वाटतात पांढऱ्या चाफ्याच्या झाडाला त्यांनी बडी मा म्हटलेलं आहे कारण त्या झाडाची पाने किंवा फांदी तोडला तर याच्यातून पांढरा दुधासारखा पांढरा शुभ्र चिक बाहेर येतो या झाडाचा आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पाना फुलांचा लपंडाव चालतो.बहवा लाल ,चिनार यासारख्या पानगळी वृक्षांची पाणी गळून पडतात व नवीन पालवी वेगवेगळ्या रंगांच्या छटा घेऊन येते पपईचा वृक्ष तीन वेळा फळे दिल्यानंतर ते मरते गुलजार यांनी या पाठामधून झाडांची वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

55. या पाठाचे शीर्षक हिरवे सांगाती या शब्दाचा अर्थ सोबती किंवा सखा असा होतो खऱ्या अर्थाने पाहायला गेल्यावर अवती भवतीची वनराई लता वेली वृक्ष हेच आपले मित्र आहेत ही सर्व मित्रमंडळी आपल्याला भरभरून त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची स्वार्थ भावना नसते निसर्गाकडून आपण अनेक गोष्टी शिकत असतो नेटाने कसे उभे राहावे हे आपल्याला निसर्ग शिकवतो निसर्ग हा आपला सांगाती तर आहे पण गुरु या या मित्राच्या सहाय्याने मानवाने गरुड झेप घेतली आहे त्याच्यावर प्रेम केल्याने आपल्याला मनस्वी आनंद म्हणून या पाठाला दिलेले हिरवे सांगाती हे शीर्षक सार्थ ठरते.

प्रश्न 9

56. निसर्गाचे संरक्षण पटवून देण्यासाठी तुमच्या मित्राला पत्र लिहा

अ ब क

गायत्री निवास

रविवारपेठ बेळगाव

तारीख 26 जुलै 2025

प्रिय मित्र विजय यास

सप्रेम नमस्कार वि. वि.

तुझे पत्र मिळाले वाचून फार आनंद झाला आता हे बघ विजय आज हे पत्र मी तुला मुद्दाम पाठवत आहे कालच आमच्या शाळेमध्ये पर्यावरण दिन साजरा केला गेला आणि त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले कारण आज सगळ्यात खरी गरज आहे ती स्वच्छ हवेची ही स्वच्छ हवा आपणाला निसर्गाचीच देणगी आहे म्हणून आपण निसर्गाचे संरक्षण केलं पाहिजे जास्तीत जास्त झाडे लावून त्यांचा संगोपन केलं पाहिजे दरवर्षी एक तर झाड लावीन व ते जगविन असा संकल्प केला पाहिजे

मित्रा पत्र मिळताच पत्राचे उत्तर कळविणे आई वडिलांना माझा नमस्कार सांग

कळावे आपला मित्र

अ ब क

विजय पाटील

मंगल निवास महाद्वारोड

पहिला क्रॉस

सावंतवाडी 5794005

प्रश्न 10. निबंध

झाडे लावा देश वाचवा

एका कार्यक्रमाचा समारोप चालू होता वक्ता आमंत्रित पाहुण्यांचे आणि सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानत होता आणि आभार मानताना पुष्पगुच्छ याची प्रत्येक आरोप देत होता अतिशय आवडते मला ही कल्पना आज एवढ्या घरातून नक्की झाडे लावली जातील आणि कुठेही तिचे प्रतीक म्हणून ती चपाती जातील आजच्या काळाची ती एक वृतांत गरज आहे

माणसांच्या हातून नकळत फार मोठा गुन्हा घडला आहे माणसाने विकास कामाच्या नावाखाली अमर्याती जंगल तोड केली वनांचा विध्वंस केला जंगलावर कुणाचा हक्क कुणाची मालकी कुणाचाही नाही म्हणजे सर्वांचे शहरे फुगत चालले तर तशा मोठ्या इमारतींची आवश्यकता निर्माण झाली वाहनांची सोय करण्यासाठी मोठमोठे रस्ते आवश्यक्य झाले मग वाटते तेणारी झाडे झाडे कसली मोठमोठे वृक्ष तोडण्यात आले घरी उभारण्यासाठी लाकूड घरी सजवण्यासाठी लाखो पुस्तके ग्रंथ कचऱ्यातील कामासाठी कागद यासाठी पुन्हा लाकूड वर्षानुवर्षी डोळ्यावर पट्टी बांधून आपण झाडे तोडत राहिलो खेडेगावातील गरजा वेगळ्या पण त्यांना त्यांना त्यांचे अन्न शिजवण्यासाठी सरपंच हवेत मग झाडे तोडली जातात

शेवटी व्हायचे तेच झाले या बेसुमार वृक्षतोडीमुळे शहरा देश झाला देशातील वनस्पती लयास गेले आणि मग नाथळ माणसांच्या लक्षात आली की पर्यावरणात चतुर बिघडला आहे का झाडे कमी झाली तसा पाऊस कमी झाला माणसे वाढली पाण्याचा उपसा अखंड चालू राहिला त्यामुळे जमिनीच्या पोटातील पाण्याची पातळी खाली गेली आता माणसाला पिण्यासाठी ही पुरेशी पाणी मिळाले कठीण झाले आहे सगळ्या जगापुढे हा प्रश्न उभा राहिला आहे

मग मात्र माणूस खळबळून जागा झाला स्वतःला वाचवण्यासाठी झाडांना वाचविले पाहिजे हे त्याच्या लक्षात आले आता कोणीच काढतो लागला की चार जण धावून त्यांचा हात धरतात त्याला वृक्षतोड करून देत नाहीत

प्रत्येक मंगल प्रसंगी वृक्षारोपणाची कल्पना आपण आता तरी स्वीकारली पाहिजे घरात बाळ झाले झाड लावा बाळा बरोबर झाडाला वाढवा पाहुणे आले त्याच्या हस्ते वृक्षारोपण करा इतकेच नाही तर घरातील प्रियजनांच्या योगप्रसंगी स्मृती वनात झाड लावून त्यांच्या स्मृती जतन केल्या पाहिजेत

जंगल तोडीच्या चुकीचे परी महाजन झाडे लावूनच अगदी खेडो पडी समाजाच्या तळागाळापर्यंत हा विचार पोहोचवायचा आहे त्यातच आपल्या देशाचा उत्कर्ष आहे.

8. मेळघाटचे शिल्पकार

प्र. 1 ला

1. क) पंचमी

2. अ) प्रथमा

3. ब) उद्गारवाचक

4. अ) पत्नी

5. ब) तत्पुरुष समास

6. ब) नीलकंठ

प्र. 2 रा

7. निरक्षर

8. अनुत्तीर्ण.

9. विसर्ग संधी

10. तनय

प्र. 3

11. मेळघाटचे शिल्पकार या पाठाच्या लेखिका मृणालिनी चितळे या आहेत.

12. मेळघाटचे शिल्पकार असे डॉक्टर रवींद्र कोल्हे व स्मिता कोल्हे यांना म्हटले आहे.

13. मेळघाटचे शिल्पकार या पाठाचे मूल्य सामाजिक बांधिलकी हे आहे

14. डॉक्टर रवींद्र कोल्हे यांच्या सहचारीणी डॉक्टर स्मिता कोल्हे ह्या होय.

15. डॉक्टर रवींद्र कोल्हे यांना महाराष्ट्रीयन ऑफ द इयर, बाया कर्वे हे पुरस्कार मिळाले आहे.

16. पॅन्ट शर्ट घालणाऱ्या मुलाला डॉक्टरांनी 'बाबू' या नावाने हाक मारली.

17. टपरी पाशी उभे असलेल्या तरुणाच्या हातात गुटख्याचे पाकीट होते.

18. डॉक्टरांच्या सांगण्यामुळे मुले आश्रम शाळेत भरती झाली.

19. शहरात जाऊन मुलांनी पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि जीनची पॅन्ट हा पोषाख स्वीकारला.

20. शिबिरे तरुण मुलांसाठी घ्यावे असे डॉक्टरांना वाटले.

21. 18 ते 20 या वयोगटातील मुले शिबिरात दाखल झाली.

22. अमरावती या जिल्ह्यात सर्वाधिक जास्त आत्महत्या होतात.

23. शिक्षणामुळे माणसांमध्ये परिपक्वता येते.

24. डॉक्टरांनी संस्था न काढताआपल्या सहचारीनी स्मिता कोल्हे यांच्याशी चर्चा केली.

25. मेळघाटातील मोहोर हे पुस्तक मृणालिनी चितळे यांनी लिहिले आहे.

प्र. 4 था

26. आई-बाबा मुलांना शाळेत पाठवीत नसत कारण मुले शाळेत गेली तर गुराढोरांचंकोणबघेलआणि शेतातकोणकाम करेल तसेचघरातीलस्वयंपाक पाणी कोण बघेल याची चिंता त्यांना सतावत असे म्हणून आई-बाबा मुलांना शाळेत पाठवीत नसत.

27. आरोग्य या विषयाबद्दल माहिती सांगताना डॉक्टरांनी आहार आणि आजार हे दोन विषय त्यांनी समाविष्ट केले. कुपोषण टाळण्यासाठी योग्य आहार म्हणजे काय त्याचबरोबर स्वच्छ पाणी आणि लसीकरणांचे महत्त्व, आजारी माणसांना रिकाम्या पोटी औषध घेतली तर होणारे औषधांचे दुष्परिणाम इत्यादी गोष्टींची माहिती दिली.

28. डॉक्टरांनी तरुणांसाठी घेतलेल्या शिबिरामध्ये शेती आरोग्य पर्यावरण आणि शासकीय या चार विषयांची ओळख ते मुलांना करून देत असत त्यामध्ये प्रत्येक विषयाचा संबंध मुलांच्या दैनंदिन जीवनाशी जोडून दाखवणे,त्यांचा आत्मविश्वास वाढविणे हा या शिबिरांचा उद्देश होता.

29. संदर्भ: वरील वाक्य मेळघाटचे शिल्पकार या पाठातील असून या पाठाच्या लेखिका मृणालिनी चितळे ह्या आहेत.

स्पष्टीकरण :जेव्हा बाहेर गावाहून आलेल्या शिक्षकांना आदिवासी मुलांच्यामध्ये कोणताही बदल दिसून आला नाही त्यावेळी त्यांनी वरील वाक्य उद्देशून म्हटले आहे.

30. पर्यावरण या विषयाचे महत्त्व पटवून देताना डॉक्टर सांगत की आदिवासींच्या पूर्वजांनी ह्या जंगलाचे संवर्धन आणि संरक्षण केलं आहे. शहरातील लोकांना या नैसर्गिक संपत्तीची अपूर्वाई वाटते तेव्हा तुम्ही शहरात जाऊन पैसे मिळवण्यासाठी धडपड करण्यापेक्षा या जंगल संपत्ती मधून कसे पैसे मिळवता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे असे ते पर्यावरण विषयाचे महत्त्व पटवून देतात.

31. शिक्षणामुळे मुलांना वेगवेगळ्या संधी मिळतील आणि जगातील घडामोडी समजतील असे डॉक्टरांचे मत होते म्हणून किमान एक मुलाला तरी शाळेत पाठवावे असा आग्रह डॉक्टरांनी आदिवासी आई-बाबांच्याकडे धरला.

32. संदर्भ वरील वाक्य मेळघाटचे शिल्पकार या पाठातील असून या पाठाच्या लेखिका मृणालिनी चितळे या आहेत .

स्पष्टीकरण : जेव्हा डॉक्टरांनी आदिवासी आई-बाबांच्याकडे मुलांना शाळेत पाठविण्यासाठी आग्रह धरला त्यावेळी त्या आई-वडिलांनी वरील वाक्यडॉक्टरांनाउद्देशूनम्हटलेआहे.

33. संदर्भ : वरील वाक्य प्रकारचे शिल्पकार या पाठातील असून या पाठाच्या लेखीकामृणालिनी चितळे या आहेत.

स्पष्टीकरण: आदिवासी मुलांच्या मध्ये शैक्षणिक प्रगती करण्यासाठी डॉक्टरांनी शाळा सुरू केली पण त्यांच्यात कोणताही बदल झाला नाही त्यावेळी डॉक्टरांनी वरील वाक्य उद्देशून म्हटले आहे.

34. अ) कळवळा करणे - विनंती करणे

आदिवासी आई-बाबांनी मुलांना शाळेला पाठवावे यासाठी डॉक्टरांनी कळवळा केला.

ब) गळघालणे = आग्रहकरणे

प्रत्यक आदिवासी मुलानी शाळेत यावे अशी डॉक्टरानी गळ घातली .

प्र. 5 वा

35. .डॉक्टर रवींद्र कोल्हे यांच्या प्रयत्नामुळे काही मुलं आश्रम शाळेत भरती झाली व शिक्षण घेऊ लागली पण शिक्षणामुळे त्यांच्यात काही बदल झाला होता तो म्हणजे शिकल्यामुळे शेतात काम करायची त्यांना लाज वाटत होती आणि शिक्षणाच्या जोरावर अर्थार्जन करण्याची क्षमता वाढली नव्हती. त्याचबरोबर त्यांच्या बाह्य पोशाखात बदल झाला होता तो म्हणजे जीन्स पॅन्ट आणि पूर्ण बाह्यांचा शर्ट ती घालू लागली आणि तात्पुरच्या स्वरूपाची मोल मजुरी करून चैन करायला शिकली होती. हा शिक्षणामुळे मुलांच्यात बदल झाला.

36. डॉक्टरांनी पाहिले की टपरीपाशी एक तरुण पाठमोरा उभा होता.त्या तरुणांने जीन्स पॅन्ट, पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि डोळ्यावर गॉगल लावला होता व त्याच्या हातात गुटख्याचे पाकीट होतं तो गुटखा आवासून तोंडात टाकत होता. त्याने डॉक्टरांना पाहताच गुटखा खिशात टाकला आणि डॉक्टरांना नमस्कार केला. त्याला पाहून तो काहीच काम करत नसणार हे डॉक्टरांनी हेरले. अशाप्रकारे टपरीपाशी उभ्याअसलेल्या मुलाचे वर्णन डॉक्टरांनी केले आहे.

37.शिबिर घेण्यासाठी येणारे शिक्षक बाहेर गावाहून आले असल्यामुळे आदिवासी वातावरण व परिस्थितीशी जुळवून घेताना त्यांची चिडाचिड व्हायची. आदिवासींची मुले पिढ्यानपिढ्या अक्षरशत्रू असल्यामुळे त्यांना शिकविण्यास त्यांना रस नव्हता.म्हणून शिबीर घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखुश असत.

प्र. 6 वा.

38. 'मरावे परी कीर्ती रुपी उरावे'

'मरावे परी कीर्ती रुपी उरावे' या म्हणीचा अर्थ असा आहे की माणसाने असे चांगले कार्य करावे की, त्याचे नाव त्याच्या मृत्यूनंतरही लोकांच्या स्मरणात राहावे माणसाने आपल्याचांगल्याकामामुळे नेहमी जिवंत राहावे.

हीम्हण'दासबोध' या ग्रंथात समर्थ रामदास स्वामी यांनी लिहिलीआहे. या म्हणीचा अर्थ आहे की माणसाने फक्त स्वतःच्या सुखाचा विचार न करता समाजासाठी लोकांसाठी काहीतरी चांगले काम करावे. असे काम करावे की ज्यामुळे त्याचे नाव नेहमी लोकांच्या ओठावर राहील उदा. समाजासाठी खूप मोठे कार्य केले, एखादी संस्था उभी केली लोकांना खूप मदत झाली तर त्याचे नाव नेहमीच स्मरणात राहील. या म्हणीत माणसाला एक महत्त्वाचा संदेश दिला आहे तोम्हणजेआपण आपल्या चांगल्या कामाने जगात ओळखले जावे आपले नाव इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहावे यासाठी प्रयत्नशील असावे. जसे की छत्रपती शिवाजी महाराज .

प्र. 7 वा

39. डॉक्टरांनी शिबिरामध्ये शेती आरोग्य पर्यावरण आणि शासकीय या चार विषयांची माहिती दिली.

शास्त्रोक्त पद्धतीनेआणि आधुनिक पद्धतीने शेती केली तर ती फायदेशीर ठरते हे ते आपल्या अनुभवाने प्रात्यक्षिकांसह दाखवून देतहोते.

आरोग्य या विषयात आहार आणि आजार हे दोन विषय त्यांनी समाविष्ट केले होते कुपोषण टाळण्यासाठी योग्य आहार म्हणजे काय त्याचबरोबर स्वच्छ पाणी आणि लसीकरणांचे महत्त्व, आजारी माणसांना रिकाम्या पोटी औषधे घेतली तर होणारे दुष्परिणाम अशा अनेक विषयावर ते प्रबोधन करीत असत.

पर्यावरण या विषयाचे महत्त्व पटवून देताना ते सांगत की जंगल संपत्तीचे खरे मालक हे आदिवासींचे पूर्वज आहेत. त्यांनीच या जंगलाचे संवर्धन आणि संरक्षण केलं आहे.

त्यामुळे शहरात जाऊन पैसे मिळविण्या पेक्षा जंगल संपत्तीतून पैसे कसे मिळवता येईल याबद्दल त्यांनी जागरूकता निर्माण केली.

शासकीय योजना संबंधीजागरूकता निर्माण करून त्या योजनांचा कसा लाभ घ्यावा आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढण्यासाठी तयार केले.

40) डॉक्टरांनी घेतलेल्या शिबिरांचा अदृश्य परिणाम खूप चांगला झाला या शिबिरातून जवळजवळ 500 कार्यकर्ते तयार झाले. या शिबिरातून व्यवहार न्याय मिळवून आलेले हे कार्यकर्ते गावासाठी काम करायला लागले. त्यांनी शेतकऱ्यांना शेतीविषयक चांगली माहिती दिली आणि शासकीय योजनांचा लाभ घेण्यास मदत केली. या शिबिरांमुळे मुलांच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आणि कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या वर्तणुकीला विरोध करण्याचे धाडस निर्माण झाले. या शिबिरांमुळे आत्महत्येचे प्रमाण कमी झाले.

41. मेलघाटचे शिल्पकार या पाठातुन रवींद्र कोल्हे यांनी आदिवासी लोकांच्या शिक्षण ,आरोग्य, स्वावलंबन आणि सर्वांगीण विकासाच्या संकल्पना मांडल्या. रवींद्र कोल्हे यांनी आदिवासी लोकांनी अंधश्रद्धा दूर करून शिक्षण घ्यावे आरोग्याची काळजी घ्यावी ,स्वावलंबी व्हावे आणि स्वतच्या हक्कांसाठी जागृत व्हावे अशी संकल्पना मांडली. त्यांच्या विकासासाठी समाजसेवा, शिक्षण आणि आरोगयासेवा यांना महत्व दिले.

42. रवींद्र कोल्हे यांनी तरुणाईचे चित्रण आशावादी आणि कर्तृत्ववान असे रंगविले आहे. मेलघाटातील तरुणांनी केवळ स्वतचा विचार न करता समाजातील आदिवासी लोकांसाठी काम करावे. शिक्षण घ्यावे, अंधश्रद्धा दूर करावी आणि समाजाच्या विकासासाठी योगदान द्यावे अशी त्यांची अपेक्षा आहे. तरुणाईमध्ये जिद्द, धाडस, सेवाभाव आणि परिवर्तन घडविण्याची ताकत आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्र. 8 वा.

43) पत्रलेखन

अ ब. क.

घर नं. 146

निपाणी

ता. चिकोडी- जि. बेळगाव

पिन. 591215

दि..

चि. मकरंद

यालाअनेकआशिर्वाद.

कालच आईचे पत्र मिळाले त्यात आईने लिहिले आहे की तू अजिबात व्यायाम करत नाहीस म्हणे. अरे मकरंद अभ्यासाबरोबर व्यायाम देखील करत रहा कारण व्यायामाचे खूप फायदे आहेत.

व्यायाम केल्याने आपले शरीर सुदृढ बनते, व्यायाम केल्यामुळे तू निरोगी राहशील व्यायाम केल्यामुळे हाडे बळकट होतात आणि व्यायाम केल्यामुळे स्मरणशक्ती सुद्धा सुधारते म्हणून अभ्यासाबरोबर दररोज व्यायाम देखील करत रहा सकाळी लवकर पहाटे उठून नियमितपणे व्यायाम कर.

कळावे

तुझा दादा

प्रति,

मकरंद

घरनं.

ता. जि. बेळगाव

प्र. 9 वा. निबंध लेखन.

44. माझा आवडता समाजसुधारक

आपला भारत देश एक विशाल राष्ट्र आहे. या देशात सर्व जाती धर्माचे लोक एकजुटीने राहतात परंतु बऱ्याचदा काही दृष्ट लोक जाती धर्मामध्ये भांडण लावून देशात दंगे घडवून आणतात आपल्या देशात एकीकडे देशाला तोडण्यासाठी कार्य करणारे दृष्ट लोक आहेत तर दुसरीकडे असेही काही समाजसुधारक होऊन गेले ज्यानीआपल्या देशाची एकता अखंडता टिकविण्यासाठी मोलाचेकार्य केले. त्या महान समाजसेवकांनी देशातीलकुप्रथानाथांबविण्याचे आणि गरिबांची मनोभावे सेवा करण्याचे कार्य केले.

आपल्या देशात सर्वच समाजसुधारकांचे कार्य मोलाचे आहे. परंतु माझे आवडते समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले हे आहेत. ज्योतिबा फुले हे आपल्या देशाचे एक मराठी लेखक विचारवंत आणि थोर समाज सुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शेतकरी आणि अस्पृश्य समाजाच्या समस्या सर्वांसमोर ठेवल्या याशिवाय स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. ज्योतिबा फुले यांच्यासामाजिक कार्याबद्दल मुंबईच्या जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली.

महात्मा फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1927 ला सातारा जिल्ह्यातील एका लहानशा गावात झाला त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. ज्योतिबा जेव्हा नऊ महिन्याचे होते तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले जोतिबांचा विवाह तेराव्या वर्षी सावित्रीबाई यांच्याशी झाला सन 1842 मध्ये त्यांनी शिक्षणासाठी पुण्याचे स्कॉटिश मिशनरी शाळेत प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लखअसल्याने त्यांनी पाच सहा वर्षातच आपला अभ्यासक्रम पूर्ण केला ज्योतिबा फुले यांनी आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांच्यासोबत मिळून स्त्रीशिक्षणाचे कार्य सुरू केले. समाजातील स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी 1848मध्येपुण्यातील भिडेवाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरू केली.ज्योतिबा फुले यांनी स्त्रियांना साक्षर बनविले आणि अस्पृश्य लोकांना बळकट बनविले. त्याचबरोबर बालविवाह, सती प्रथा, जातीवाद यासारख्यागोष्टी विरुद्धआवाज उठविलाआणि समाज सुधारण्याचा प्रयत्न केला म्हणून माझे आवडते समाज सुधारक ज्योतिबा फुले हे आहेत.

9.वाटणी

प्र 1 ला.

1 अ.द्वंद्व समास

2 ड. क्रियाविशेषण

3 ब.पुष्कळ

4 ब. मोठा

5 क. तृतीया

6 ड. षष्ठी

7 अ. दुहेरी अवतरण चिन्ह

प्र. 2 रा. एका वाक्यात उत्तरे

8 रा.रं.बोराडे

9 रावसाहेब रंगराव बोराडे

10 'पाचोळा' या लघुकादंबरीला

11 मळणी

12 कथासंग्रह

13 सामाजिक समस्या

14 सहा महिन्यापासून

15 डागण्या दिल्यासारखे

16 लंगोटीभर जमीन

17 कुस्तीच्या आखाड्यात बसलेल्या पैलवानासारखे

18 कणगीचा

19 तीन वाटण्या

20 27 एकर

21 गणातात्यांनी तिसरी वाटणी

22 तुम्हाला कसं जमतं तसं करा आम्ही नसल्यातच जमा

23 वाटणी करण्यासाठी

प्र.3रा. दोन तीन वाक्यात उत्तरे

24 लेखक रा.रं.बोराडे, पूर्ण नाव रावसाहेब रंगराव बोराडे 1940, ग्रामीण जीवन ,ग्रामीण व्यक्तिरेखा आणि ग्रामीण भाषा ही लेखनाची वैशिष्ट्ये, त्यांच्या लेखनात ग्रामीण भाषेचा गोडवा,लकबी आणि रांगडेपणा दिसून येतो.माळरान',‘बोळवण', मळणी इ. कथासंग्रह, मळणी व पाचोळा या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेला आहे.

25 गणातात्यांच्या घरात दोघा भावांमध्ये आणि त्यांच्या बायकांमध्ये वाटणीच्या कारणांनी धुसफुस वाढत होती त्यांच्या वादात कधी शेतकाम खोळंबत होते तर कधी चूल बंद होत होती. दिवसेंदिवस घरातील कटकटी व तणाव वाढत चालला होता तेव्हाच गणातात्यांना या गोष्टीची कल्पना आली होती.

26. वाटणी करावी म्हणून घरात दररोज भांडण होत होती,कधी शेत काम खोळंबत होतं तर कधी चुल बंद राहत होती.घरातील कटकटी वाढत चालल्या होत्या कारण दोघा भावांना वाटण्या करायच्या होत्या.

27. तात्यानी खूप कष्टाने ऊन पावसाची तमा न बाळगता दिवसरात राबून 27 एकर जमीन कसत होते.निम्म्याच्यावर जमीन त्यांनी स्वकष्टाने कधी हौसमौज न करता कमावली होती.

28 वाटणी करतेवेळी मुलाने आई-बाबा बद्दल तिसरी वाटणी न देता एका मुलाकडे सहा महिने आईने राहावे आणि दुसऱ्या मुलाकडे सहा महिने वडिलांनी राहावे व हे पुन्हा अदलाबदली करावे अशा प्रकारे मुलाने आई-बाबा बद्दल निर्णय घेतला होता.

प्र.4था.

29.“तात्या पोरं वाटणी करायची म्हणायलेत”

संदर्भ: वरील वाक्य रा.रं.बोराडे लिखित 'मळणी' या कथासंग्रहातील वाटणी या पाठातून घेतलेले आहे. या पाठाचे मूल्य 'सामाजिक समस्या'हे आहे.

स्पष्टीकरण: वरील वाक्य गावचे पंच देवबा पाटील यांनी गणातात्याना उद्देशून म्हटले आहे.गणातात्यांची दोन्ही मुले वाटणी करावी म्हणून भांडत होते तेव्हा गावातील पंचांना एकत्र बोलावून वाटण्या करण्यासंदर्भात वरील वाक्य म्हटले आहे.

30 "तात्या उगं का शिळ्या कढीला ऊत आनताव"

संदर्भ: वरील वाक्य रा.रं.बोराडे लिखित 'मळणी' या कथासंग्रहातील 'वाटणी' या पाठातून घेतलेले आहे. या पाठाचे मूल्य 'सामाजिक समस्या' हे आहे.

स्पष्टीकरण: वरील वाक्य पंच देवबा पाटील यांनी गणातात्यांना उद्देशून म्हटले आहे. धाकट्या मुलाने जमिनी संदर्भात "लंगोटीभर जमीन"असा उल्लेख करून हेटाळणी केल्यानंतर गणातात्याबरोबर झालेल्या वादाच्या वेळी वरील वाक्य म्हटलेले आहे.

31" करायच्या तर तीन वाटण्या करा"

संदर्भ: वरील वाक्य रा.रं.बोराडे लिखित 'मळणी'या कथासंग्रहातील 'वाटणी' या पाठातून घेतलेले आहे. या पाठाचे मूल्य 'सामाजिक समस्या' हे आहे.

स्पष्टीकरण: वाटण्या करत असताना गणातात्यांनी पंचांना व मुलांना उद्देशून वरील वाक्य म्हटले आहे. जेव्हा मुलं दोनच वाटण्या करण्यास पंचाना सांगत असतात तेव्हा गणातात्यांनी करायच्या तर तीन वाटण्या करा असे सर्वांना उद्देशून म्हटले आहे.

32." म्या तरी काय गुत्त घेतले का"

संदर्भ: वरील वाक्य रा.रं.बोराडे लिखित 'मळणी'या कथासंग्रहातील 'वाटणी'या पाठातून घेतलेले आहे. या पाठाचे मूल्य 'सामाजिक समस्या' हे आहे.

स्पष्टीकरण: तीन वाटण्या करण्यास दोन्ही मुलांनी विरोध केल्यानंतर आई-वडिलांची सोय कशी करायची यावरून सोपानराव म्या तात्यांना संबाळतो असे म्हटल्यानंतर धाकट्याची बायको या गोष्टीला विरोध करते व आत्याबाईना नसंभाळता त्या देखील तात्यांना संबाळतो असे म्हणतात तेव्हा थोरली सून काही नऐकता वरील वाक्य म्हणते.

प्र. 5 वा. वाक्य प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

33.अ) मस्तक बधिर होणे-डोके सुन्न होणे.

34. धाकट्या मुलाचे बोलणे ऐकूनगणातात्यांचेमस्तक बधिर झाले.

35.) हैराण होणे- बेजार होणे,

वाटणीच्या घोळाने गणातात्या हैराण होऊन गेले होते.

36.हेटाळणी करणे - तिरस्कार करणे

धाकटा मुलगा नेहमी गणातात्यांची हेटाळणी करायचा.

37.संतापाने भडकणे - रागाने चिडणे

वाटणीच्या भांडणावरून गणातात्या संतापाने भडकले होते.

38) जीव घाबराघुबरा होणे - भीती वाटणे

गणातात्याच्या अस्वस्थ आरोग्याकडे पाहून पत्नीचा जीव घाबराघुबरा झाला.

गुत्त घेणे - ठेका घेणे

गणातात्याना सांभाळायचा गुत्ता घेण्यास कोणी तयार नव्हते.

37.अ) डागण्या देणे - चटके देणे

सोपानरावांचे बोलणे गणातात्यांना डागण्या दिल्यावाणी वाटत होते.

आ)चेहरा बोहरणे - चेहरा काळवंडणे

वाटणीच्या वेळी झालेल्या भांडणामुळे गणातात्यांचा चेहरा बोहरला होता.

38.अ) जिव्हारी झोंबणे- मनाला लागणे

धाकट्या मुलाचे बोलणे गणातात्यांच्या जिव्हारी झोंबत होते.

आ) पांग फेडणे - उपकार फेडणे.

आई-वडिलांचा सांभाळ करून आम्ही त्यांचे पांग फेडले पाहिजे.

39.अ) अवसान जाणे - धीर नाहीसा होणे

परीक्षा दिल्यानंतर निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांचे अवसान जाते.

आ) शिळ्या कढीला ऊत येणे - गतकाळातील गोष्टी उकरून काढणे

प्र. 5 वा.

39.वाटणीच्या घोळाने गणातात्यांच्या घरात धुसपुस व भांडणाची परिस्थिती निर्माण झाली होती दोघा भावांच्या बायका दररोज काही ना काही कारणाने भांडत होत्या.त्यांच्या वादात कधी शेतकाम खोळंबत होती तर कधी चूल बंद होत होती. दिवसेंदिवस घरातील कटकटी व तणाव वाढत चालला होता.

40. तिसरी वाटणी गणातात्यानी मागितली कारण दोन्ही मुले गणातात्या व त्यांच्या पत्नीला सांभाळण्यास तयार नव्हते.जेंव्हा वाटण्या करण्यात येत होत्या तेंव्हा दोनच वाटण्यावरती मुले अडून होती. पण त्यांना सांभाळण्यास तयार नव्हती म्हणून गणातात्यानी. तिसरी वाटणी मागितली

41. गणातात्यांची दोन्ही मुले वाटणी करण्याचा निर्धार करतात त्यामुळे गणातत्यानं फार दुख होते. ते व्यथित होतात. ओसरीवर बसलेल्या लोकांच्याकडे पाहून ते निराश होतात. दोन्ही मुले त्यांची व त्यांच्या पत्नीची वाटणी करण्याच्या तयारीत असंत . अशी आई वडिलांची वाटणी होत असल्याचे बघणे क्लेशदायक वाटते. वृद्ध आईला सांभाळण्यास दोन्ही मुलगे नकार देतात. या संघर्षातून घरातील कुटुंबियांच्यामधील नात्यातील दुरावा उघाड होतो. शेवटी गणातात्या असा निर्णय घेतात की कोनत्याही मुलाकडे ब राहता पाती पत्नी एकत्र स्वतंत्र राहण्याचा

निर्णय घेतात. कारण त्यानं पाती पत्नी एकत्र राहायच असते. दोघी जावयांचे बोलणे सुधहा त्यानं झोंबत असत. त्यामुए त्यांना दुख वाटत म्हणून ते स्वतंत्र राहण्याचा निर्धार करतात.

10 . क्रांतिज्योती सावित्रीबाई

प्रश्न 1 ला

1. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या पाठाच्या लेखिका सुषमा देशपांडे

2. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या पाठाचे मूल्य समाज कल्याण, निष्ठा हे आहे.

3. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या पाठाचा साहित्यप्रकार एकपात्री नाटक हा आहे.

4. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या पाठाचे संपादन व्हय ,मी सावित्री बाई या एकपात्री नाट्यातून केलेले आहे.

5. महात्मा फुले यांना पक्षाघात झाल्यावर सार्वजनिक सत्यधर्म हे पुस्तक पूर्ण केले.

6. महात्माफुले यांनी नगरला जाऊन फरार मॅडमची भेट घेतली.

7. सावित्रीबाईचा जन्म नायगाव येथे झाला.

8. सावित्रीबाईचे लग्न फुल्यांचा मुलगा जोतिबा यांच्याशी झाले.

9. सावित्रीबाई आपल्या पतीना शेटजी या नावाने हाक मारत.

10. सावित्रीबाई सासरी सागरगोटे व काचा कवड्या हे खेळ खेळत होत्या.

11. शेटजी नगरला शाळेत गेले होते.

12. नगरहून शेटजीनी सावित्रीबाईसाठी पाठी, पुस्तक, पेन्सिल आणले.

13. महात्मा फुले यांच्यासोबत नगरला जाताना सदाशिव गोवंडे होते.

14. महात्मा फुले यांचे डॉक्टर घोले हे होते.

15. लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांना म्हणतात.

16. महात्मा फुलेंच्या दत्तक पुत्राचे नाव यशवंत हे होय.

17. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

18. शारदा सदनची स्थापना पंडिता रमाबाई यांनी केली.

19. सार्वजनिक सत्यधर्म हे बाई माणसांची थोरवी सांगणारे पुस्तक आहे.

20. सावित्रीबाईच्या वडिलांचे नाव नेवासे पाटील हे होते.

21. यशवंत काशीचा मुलगा होता.

22. महात्मा फुले यांच्या सहकाऱ्यांची नावे डॉ घोले, माटे, भिडे,ससाने पंडित,अण्णासाहेब चिपळूणकर,

प्रश्न 2 रा

23 महात्मा फुले यांना सावित्रीबाई आदराने शेटजी म्हणत असत.महात्मा फुले सतत मोठ मोठी पुस्तके वाचण्यात मग्न असत,वाचन करणे लेखन करणे हा त्यांचा छंदच होता. याच कामात ते शाळेत सदा दंग असायचे.

24 . महात्मा फुले यांनी अनेक सामाजिक कार्ये केली.त्यापैकी अस्पृश्य लोकांना व मुलींना शिक्षण मिळण्यासाठी शाळा सुरू केल्या. शुद्रांसाठी पिण्याच्या पाण्याचा हौद खुला केला. शूद्र मुलांना बोर्डिंग सुरू केले. सत्यशोधक समाज, बालहत्या प्रतिबंधक गृह, ही सामाजिक कार्य केली.

25 . महात्मा फुले आपल्या मित्राकडे नगरला गेले होते. फुले व मित्र कोणत्यातरी शाळेत गेले. तिथे कोणीतरी 'फरार' नावाची मॅडम होती, तिच्याकडे जाऊन शाळा कशी शिकवावी ,काय शिकवाव,कसं शिकवाव हे विचारण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले नगरला गेले होते.

26 महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या शाळेत मुलींना शिकवायला सावित्रीबाई जाऊ लागल्या त्यावेळी जाता येता वाटेत त्यांना त्रास होऊ लागला कोणी त्यांची छेड काढत,कोणी त्यांना बघून थुंकत होते. तर काही लोक खिडकीतून बघून त्यांना शिव्या द्यायची अशा प्रकारचा त्रास सावित्रीबाईना शाळा शिकवताना झाला.

27 'बालहत्या प्रतिबंधक गृह' महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी सुरू केले.पुरुषांकडून फसवल्या गेलेल्या स्त्रियांसाठी हे गृह होते 'काळे पाणी टाळण्याचा उपाय' अशा जाहिराती छापून फसलेल्या बायकांनी ज्योतिराव गोविंदराव फुले यांचे घरी येऊन बाळंत होऊन जावे,त्यांचे नाव गुप्त ठेवले जाईल.अशा जाहिराती तीर्थक्षेत्रावरती लावल्या गेल्या.

28 "थांबा मी हाय जित्ती आता नग शिकवू मला रीत भात"

संदर्भ: वरील वाक्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या या पाठातील असून या पाठाच्या लेखिका सुषमा देशपांडे आहेत.हा पाठ 'व्हय मी सावित्रीबाई' या एक पात्री नाटकतून निवडलेला आहे.

स्पष्टीकरण : हे वाक्य सावित्रीबाईनी म्हटले आहे.महात्मा ज्योतिराव फुले यांचा मृत्यू झाला व टिटव कोणी घ्यावं यावरून वाद सुरू झाला.तेव्हा सावित्रीबाईनी वरील वाक्य म्हटलेले आहे.

29 सुषमा प्रभाकर देशपांडे (1955) या मूळच्या प्रायोगिक रंगभूमीच्या कलाकार आहेत.सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर संशोधन करून त्यानी चरित्रनाट्य,एक पात्री नाटक हा वेगळा प्रकार केला आणि या नाटकाचे 2500 प्रयोग त्यानी केले 'एशियन नाईट्स' यांच्याकडून या नाटकाचे प्रयोग बाहेर देशात पण झाले.महाराष्ट्र सरकारकडून त्यांना 'सावित्रीबाई फुले' पुरस्कार मिळाला.खेडेगावातील स्त्रियांच्या बचत गट या संकल्पनेसाठी 23 वर्षे कार्य केले. 'मुक्ताईची पाऊलवाट' हे मासिक चालवल.

प्रश्न 3.

30 महात्मा फुले यांच्या सामाजिक शैक्षणिक कार्यात त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी भाग घेतला होता.त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम केलं,त्यासाठी अपार कष्ट घेतले.फुले यांच्या आग्रहाखातर सावित्रीबाई घरीच शिकल्या आणि शाळेत शिक्षिका झाल्या एक शूद्रजातीची स्त्री शिक्षिका झाली म्हणून समाजाने त्यांना त्रास दिला,पण तो त्रास सहन केला आणि आपले कार्य चालूच ठेवले.महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर अंत्ययात्रेच्या वेळी उदगारलेल्या प्रसंगाला त्या मोठ्या धिराने स्वतः टिटव हाती धरलं.महात्मा फुलेंच्या कार्यात सावित्रीबाईचे फार मोठे योगदान आहे म्हणून खऱ्या अर्थाने त्या सहधर्मचारिणी होत्या.

31. महात्मा ज्योतिराव फुले यांचा मृत्यू झाला त्या ठिकाणी टिटव कोणी उचलावं याबद्दल वाद झाला पण सावित्रीबाईनी स्वतः टिटव उचललं व त्या चालू लागल्या तसेच गजानन व यशवंत हे त्यांच्याजवळ आले व बाजूने चालायला लागले.जस जस त्या चालू लागल्या तसे एकेक पावलाबरोबर अनेक आठवणी येत होत्या. त्यांचं लग्न, त्यांच शिकण, त्यांची शाळा,काशीचा पोरगा यशवंत,पिण्याच्या पाण्याचा हौद, गुलामगिरी हे पुस्तक, बालहत्या प्रतिबंधक गृह, मृत्युपत्र, सत्यशोधक समाज त्यांना या सर्व गोष्टी आठवत होत्या.

32. सावित्रीबाईचे शिक्षण घरातच झाले आणि शाळेत त्या शिकवायला जाऊ लागल्या.लोक येऊन खिडकी समोर उभे रहायचे,घाण घाण शिव्या द्यायचे,ओरडायचे एक शूद्र बाई शिक्षिका म्हणून शिकवायला लागली महाभयंकर, माजले हे शूद्र. कोणी छेड काढायचे,कोणी बघून थुंकायचे अशा प्रकारच्या प्रतिक्रिया शाळेत गेल्यावरती सावित्रीबाईना ऐकायला मिळायच्या.

33. महात्मा फुले यांचे सामाजिक शैक्षणिक कार्य फार मोठे आहे सामाजिक कार्याबरोबरच आपले विचार पटवून सांगण्यासाठी शेतकरी, दलित आणि स्त्रियांच्या उद्धारासाठी वैचारिक साहित्य लिहिले त्यातील 'सार्वजनिक सत्यधर्म'या ग्रंथाचे लेखन चालू होते आणि अचानक एक दिवशी त्यांना पक्षाघाताचा झटका आला शरीराची उजवी बाजू लुळी पडली.घोले डॉक्टर यांनी लगेच औषध उपचार सुरू केले थोडं बरं वाटल्यावर तशाही अवस्थेत डाव्या हाताने या ग्रंथाचा राहिलेला अर्धा भाग लिहून काढला.

प्र .4 था

34. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी होत्या.फुलांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात त्यांच्या खांदयाला खांदा लावून काम केले त्यासाठी त्यांनी अपार कष्ट व त्रास

सहन करावा लागला फुलांच्या आग्रहाखातर त्या स्वतः घरी शिकल्या व शाळेत शिक्षिका म्हणून काम करू लागल्या हे करत असताना त्यांना समाजाकडून खूप त्रास देण्यात आला कारण त्या एक शूद्र स्त्री शिक्षिका म्हणून काम करू लागल्या महाभयंकर पाप घडत आहे असे लोक म्हणत होते तो त्रास त्यांनी सहन केला आणि आपले कार्य चालूच ठेवले महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर अंत्ययात्रेच्या वेळी उद्भवलेल्या प्रसंगाला त्या मोठ्या धीराने सामोरे गेल्या.स्वतः टिटवं हातात धरलं आणि एक क्रांतिकारक पाऊल उचलले यावरूनच त्या खऱ्या सहधर्मचारिणी होत्या हे स्पष्ट होते.

35. महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी खूप मोठी योगदान दिलेले आहे तळागाळातील लोक शिकावेत यासाठी शाळा सुरू केल्या शिक्षण मिळावं यासाठी मुलींसाठी शाळा सुरू केली उन्हाळ्यात पिण्यासाठी पाणी सुद्धा मिळणे कठीण त्यावेळी अस्पृश्यांसाठी आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद ज्योतिबांनी खुला केला. तसेच सत्य शोधक समाजातर्फे त्यांनी भटजी शिवाय लग्न लावली शूद्र व अतिशूद्रांसाठी बोर्डिंग सुरू केले.बालहत्या प्रतिबंधक गृह काढून पुरुषाकडून फसवलं गेलेल्या स्त्रियांना या प्रतिबंधक गृहाचा फायदा झाला व असे अनेक कार्य समाजासाठी सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फुले यांनी केले.

36. महात्मा ज्योतिराव फुले यांना पक्षाघाताच झाल्यानंतर त्यांची तब्येत रुटूखूटूच चालू होती. त्यांचा मृत्यू झाला.महा यात्रेची तयारी सुरू झाली. त्यांना न्यायची वेळ आली तेव्हा महादबा आणि बाबा त्यांचे भाऊबंद आडवे आले; आणि म्हणाले,जोतिबा आमचा भाऊबंद त्यांच्या शवास आम्हीच खांदा देणार असे ऐकल्यावर सावित्रीबाई पुढे आल्या व त्या टिटवं घेऊन त्या महायात्रेत्त चालू लागल्या.त्या चालत असताना त्यांनी केलेल्या एकेक कामांची त्यांना आठवण येऊ लागली.त्यांची शाळा,त्यांचं शिक्षण,काशीचा पोरगा यशवंत,पिण्याच्या पाण्याचा हौद,गुलामगिरी पुस्तक,शूद्रांचे बोर्डिंग,बालहत्या प्रतिबंधक गृह,मृत्युपत्र, सत्यशोधक समाज या सगळ्या गोष्टी त्यांना आठवू लागल्या.

37. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका आणि थोर समाज सुधारक होत्या. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे 3 जानेवारी 1831 मध्ये झाला. वयाच्या अवघ्या नव्या वर्षी सावित्रीबाईचे लग्न पुणे येथील ज्योतिबा फुले यांच्याबरोबर झाला त्यावेळी जोतिबा फुले यांचे वय तेरा वर्षे होते. विवाह वेळी सावित्रीबाई अशिक्षित होत्या परंतु पुढे पती जोतिबा फुले यांनी घरीच त्यांना पाटी आणि पेन्सिल देऊन लिहायला आणि वाचायला शिकवले. अशाप्रकारे सावित्रीबाई साक्षर झाल्या. शिक्षिका शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली भिडे वाड्यातील या मुलींच्या शाळेत पहिल्या महिला शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले काम करू लागल्या त्यावेळी स्त्रीने शिकणे व शिकविणे हा अधर्म मानला जायचा त्यामुळेच सावित्रीबाई शिक्षिका होऊन जात असताना त्यांना अनेक त्रासांना सामोरे जावे लागले सनात आणि लोकांनी त्यांच्यावर शेण दगड चिखल फेकला परंतु सावित्रीबाईनी हार मानली नाही आपल्या सोबत दुसरी साडी घेऊन जाऊन साडी बदलून शाळेतील मुलींना शिकवण्याचे कार्य त्यांनी केले.

11. आई समजून घेताना

प्र 1 ला

.1 क) अव्ययीभाव समास

2 अ) अव्ययीभाव समास

3 क) द्वंद्व समास

4 अ) नञ् तत्पुरुष

5 ब) मध्यमपदलोपी समास

प्र 2 रा

6 सप्तमी तत्पुरुष

7 षष्ठी तत्पुरुष

8 अव्ययीभाव समास

9 उत्तमकांबळे

10 आत्मकथन

11 मातृमहिमा]

12 आईसमजूनघेताना

13 आक्का

14 टाकळवाडी

15 उत्तम

16 सातवीला पहिला आलो

17 फ़ांद्याचा भारा

18 बर झाल पास झालास बाबा

19 दीडच भाकरी मिळतं असे

20 आता पुढच्या शिक्षणाला लई खर्च येईल का?

21"बाबा थळोबा माइया पोराच्या कामात यश दे तुला नारळ देईन"

22 मिलीटरीत

23 तू मरत का नाहीस कशाला जगतोस भुईला भार होऊन.

24 बर झाल अक्का सुटली नवऱ्याच्या संकटातून.

25 समाजव्यवस्थेने

26 लेकरांच्या भविष्यात

27 भाकरीच्या ढाईत

28 इलंदा

प्र. 4

29कसली बातमी भारा वाहून डोक्याला कड आलाय. एक जण जळण्याचं नाव काढत नाही एकटी आई किती मरेल? कोणी विचार करत नाही. डोक्यात फणी घातली की केसांचा पुंजका हाताला येतोय

30 लेखक पास झाल्यामुळे त्यांच्या पुढच्या शिक्षणाचा काय करायचं? पुढच्या खर्चाचं काय करायचं?या चिंतेने लेखकांच्या आईला घेरलं होतं. लेखक शिकले पाहिजेत त्यामुळेच त्यांचं नशीब उजाडणार होतं पण खर्चाचं काय करायचं? मजुरी वाढत नाही, पाऊस पडत नाही लोक मुलखावरर चाललेत मजुरीला या सर्व विचारांनी लेखकांच्या आईचा चेहरा गंभीर झाला.

31. लेखक पाणी आणायला जात असताना चुलीतली राख बाहेर काढत काढत लेखकाला आई म्हणाली, बरणीतली चिमूटभर साखर तोंडात टाक आणि हो चिमूटभरच घे उद्या तुझ्या बाला चहासाठी ठेव.

32 तिला वाटते की अण्णांना दारू सोडावी, रोज कामाला जावे,पैसे मिळवावेत, संसारासाठी वापरावेत, पोरांना शिक्षणासाठी द्यावेत, घर बांधावं,पोरांना कपडे द्यावेत.

33. आईने लेखकाला आश्वासन दिले की तू काळजी करू नकोस तू शिक. आणखी राबिन मी.

34. लेखकाने आईला काळजी करू नकोस सांगितले कारण, त्यांनी रायबागला बोर्डिंगला जायचं ठरवलं होतं.तिथं जेवण मोफत, राहणं मोफत आणि शिक्षण ही मोफत मिळत.रायबागलाही ते चालत जाणार होते डोक्यावर ट्रंक घेऊन त्यामुळे जायलाही पैसे लागणार नव्हते.

35. रात्रंदिवस राबणाऱ्या आणि असंख्य वेळा पाणी पिऊनच भूक मारणाऱ्या लेखकांच्या आईच्या मदतीला कोणतेच देव येत नव्हते. उलट देवांनाच नारळ नैवेद्य लागत असे. म्हणून लेखकांचा माळावरच्या थळोबावर विश्वास नव्हता.

36. आपली मुलगी इलन्दा सासरी सुखी नाही. तिचा नवरा दारू पितो, मारतो.अशा घरात आपण मुलीला दिली यासाठी आजोबांना वाईट वाटत असे.

37. अण्णा मरण पावल्यानंतर अक्का परिस्थितीने व्याकुळ होऊन जमिनीवर डोकं आपटून आक्रोश करत होती. उठता बसतांना शिव्या देणारी आज वेगळ्याच रूपात दिसत होती ओठावर शिव्या असल्या तरी काळजात नवऱ्याविषयी अपरंपार प्रेम आणि श्रद्धा असलेली अक्का शोक मग्न दिसतहोती.

38. लेखकाबरोबर भांडण झाल्यावर लगेच तिला आपल्या नवऱ्याची आठवण येईल वाघासारखा माझा नवरा गेला म्हणून तुमचं बोलणं खाण्याची वेळ माझ्यावर आली अशा शब्दात ती आपल्या काळजात खोलवर रुतलेला आणि कधीही विस्मरणात न जाणारा आपला नवरा व्यक्त करायची.

प्र. 5

39. संदर्भ: वरील वाक्य हे लेखक उत्तम कांबळे यांच्या आई समजून घेताना या पाठातून घेतलेले आहे.उत्तमकांबळे यांच्या आईने हे वाक्य म्हटले आहे.

स्पष्टीकरण: थळोबा नावाच्या माळावरच्या देवावर लेखकांच्या आईचा विश्वास होता. हा देव आपल्या मुलाच्या कामांमध्ये यश देईल असा तिचा विश्वास होता.

40स्पष्टीकरण :आपल्या मुलाने पुढचे शिक्षण घेतले पाहिजे. तो जर शिकला तरच आपल् आयुष्य उजळणार, त्यासाठी किती खर्च आला तरी तो करण्याची तयारी आहे.हे सांगत असताना आईने हे वाक्य म्हटलेआहे.

41 स्पष्टीकरण :अक्का अण्णांना जिवंत असताना तू मरत का नाहीस कशाला जगतोस जमिनीला भार होऊन असं वारंवार म्हणायचीजेव्हा अण्णा वारले लेखकाला वाटले अक्का अण्णांच्या संकटातून सुटली पण अक्का मात्र व्याकुळ झाली. हे अक्काचं रूप लेखकांसाठी नवीन होते.

42. स्पष्टीकरण : आपल्या मुलांचे भविष्य घडवण्याकरता आयुष्यभर राबलेल्या अक्काने वर्तमान आपल्या मुलांसाठी गहाण टाकले इतिहास समजव्यवस्थेने नाकारला म्हणून ती स्वत:च भविष्य आपल्या मुलांमध्ये पाहत असे.

प्र. 6

43उत्प्रेक्षा अलंकार

लक्षण : उपमेय हेजणू उपमानच आहे असे जिथे वर्णिले असते तिथे उत्प्रेक्षा अलंकार असतो.

44उपमा अलंकार

लक्षण : दोन वस्तूतील साम्य चमकृतिपूर्ण रीतीने जिथे वर्णन केलेले असते तिथे उपमा अलंकार होतो.

45. उत्प्रेक्षा अलंकार

लक्षण : उपमेय हे जणू उपमानच आहे असे जिथे वर्णिले असते तिथे उत्प्रेक्षा अलंकार असतो.

46. उपमा अलंकार

लक्षण : दोन वस्तूतील साम्य चमकृतिपूर्ण रीतीने जिथे वर्णन केलेले असते तिथे उपमा अलंकार होतो.

प्र.7

47.लेखक सातवीच्या परीक्षेत शाळेत पहिल्या नंबरने पास होतात. ही बातमी अक्काला सांगितल्यावर तिलाही आपल्यासारखा खूप आनंद होईल असे लेखकाला वाटते पण तसे झाले नाही. लेखकाने आपण पास झाल्याची बातमी सांगूनही अक्काच्या चेहऱ्यावर आनंदापेक्षा काळजीच जास्त जाणवत होती. आपला मुलगा हुशार आहे त्याला जरा आपण पुढे शिकवलं तर आपले भविष्य उजळेल असे तिला वाटते पण हे जरी खरं असतं तरी घरचीआर्थिक परिस्थिती कठीण होती

48. लेखकाने आनंदाची बातमी सांगूनही अक्का आनंद व्यक्त करत नाही. उलट लेखकाला आपण करीत असलेल्या कष्टाची तक्रार बोलून दाखवते आणि आडाच पाणी आणायला सांगते. लेखक हिरमुसतो.आईला आनंद का झाला नसेल?या प्रश्नांच्या विचारातच लेखक विहिरीवर पाणी आणायला जातो व पाणी घेऊन परत येताना अनेक प्रश्न त्यांना पडतात. आपल्या पोटापाण्याचा प्रश्न व्यवस्थित मिटला असता तर अक्कांने आनंद व्यक्त केला असता का?तिची सारी ताकद व बळ भाकरीच्या लढाईतच खर्च होत असेल का? आनंद व्यक्त करण्यासाठी आईकडे बळच नसेल का? अशा अनेक प्रश्नांचे ओझे घेऊन लेखक परत आले.

49 मला चांगली नोकरी लागेल,नोकरीच्या पैशातून मी अक्काला इतकं भारी लुगडं घेईन की सारे बघत राहतील.मी तिला माझ्याकडेच ठेवून तिचा सांभाळ करीन. तिला कसलाही त्रास होऊ देणार नाही.खायचं आणि निवांत बसायचं.मी अन्नाला चाकरीतून मुक्त करेन, खूप कष्ट करेल व स्वत:साठी घर बांधेल असे लेखक दिवा स्वप्न पाहत होते.

50. अण्णा गेल्यावर लेखकांची आई खूपच शोक मग्न झाली. अतिशय उद्विग्न मनस्थितीत ती वावरत होती.तिच्या काळजात अण्णा विषयी अपार प्रेम व श्रद्धा होती.कधी कधी लेखाव लेखकांबरोबर ही तिचे भांडण होत असे त्यावेळी तिला आपल्या नवऱ्याची आठवण येईन व आपला वाघासारखा नवरा गेला म्हणून सर्वांचे बोलणं खाण्याची वेळ माझ्यावर आली असं ती म्हणत असे.

51. अण्णा जिवंत असताना दारूच्या कारणावरून आईचे वअण्णाचे रोज भांडण होत असे.एक दिवस दारूमुळेच अण्णांनी आपले जीवन संपवले. अण्णा गेल्यावर मात्र आईला खूप वाईट वाटले.आपला कुंकवाचा धनी गेला म्हणून जमिनीवर डोकं आपटून ती आक्रोश करीत होती.तिच्या काळजात अण्णा विषयी अपार प्रेम व श्रद्धा होती नवरा गेल्याचे दु:ख एका रानमुंड बाईलाच कळतं असं ती म्हणायची. म्हणून अण्णा वारल्यानंतर आईचे जगच खल्लास झाले असे लेखकांना वाटते.

52. उत्तम मारुती कांबळ

जन्म 1956,

श्राद्ध, अस्वस्थ, नायक या कादंबऱ्या.

रंग माणसाचे, कथा माणसांच्या, कावळे आणि माणसं, परत त्या न दिसणारी लढाई इत्यादी कथासंग्रह

देवदासी,नग्न पूजा, भटक्यांचे लग्न,कुंभमेळा अनिष्ट प्रथा इत्यादी संशोधन पर ग्रंथ,

जागतिकीकरणात माझी कविता, नाशिका तू एक सुंदर कविता,पाचव्या बोटावर सत्य इत्यादी कवितासंग्रह,

आई समजून घेताना,वाट तुडवताना ही आत्मकथन.

थोडसं वेगळं, तिरंग्यातून गेला बाप ही ललित पुस्तके

प्र. 8

53. अण्णांनी दारू सोडावी रोज कामाला जावे थोडीफार पैसे मिळवावेत ते पैसे आपल्या संसारासाठी वापरावेत पुराना शिक्षणासाठी खर्च करावा स्वतःच घरकुल बनवा पोरांना कपडे घ्यावेत अशी एखाद्या सर्वसामान्य गृहीणीसारखीच अपेक्षा अक्काला अण्णांकडून होती.कारण आपण अण्णांनी मी दारूच्या नशेत झिगलेले असत.दररोज घरी अक्काला मारत असत,शिव्या देत असतात तुम्हाला आणि शिव्या खात बिचारी ती संसार करायची काबाड कष्ट करून पूर्ण कुटुंबाचा सांभाळ करायची. म्हणून अण्णांनी दारू सोडावी चांगले वागावे असे तिला वाटत असेल .

54. पहिल्या प्रसंग म्हणजे, लेखक पास झालेला आपण पास झाल्याची बातमी आईला लवकरात लवकर सांगून आईला आनंद वाटावा म्हणून लेखक प्रयत्न करतो पण अपार कष्टांमुळे ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती पण शेवटी लेखकाने जेव्हा आईला बातमी सांगितली तेव्हा आईला आनंद होण्याऐवजी तिच्या चेहऱ्यावर काळजी अधिक चरवली लेख कांच्या यशाचा आज आनंद तिला का वाटत नसेल असा प्रश्न पडला पण आईने जेव्हा लेखकाला पुढच्या शिक्षणासाठी खर्च विचारला व काहीही झालं तरी पुढे शिक आणखी राबेन असं सांगितलं त्यावेळी आईची तळमळ लेखकांना जाणवली . दुसरा प्रसंग आहे वडिलांच्या मृत्यूचा. वडील जिवंत असताना रोज त्यांच्याशी भांडे पण वडील मेल्यावर तिने व्यक्त केलेला शोक यावरून त्यांच्या आईच्या काळजातील प्रेम दिसून आले या दोन्ही प्रसंगातून लेखकाने आपल्याला आईला खऱ्या अर्थाने समजू न घेतले आहे.

55. लेखक उत्तम कांबळे यांचा जन्म एका गरीब कुटुंबात झाला. अतिशय प्रतिकूल परिसतिथित लेखकाने आपल्या आईला समजावून घेतले. अत्यंत बिकट पतीसतिथित लेखकाच्या आईने कुटुंबांचा सांभाळ कसं केला हे लेखकाने अगदी जवळून पाहिले होते. स्वताची भूक मारून मुलांचे पोट भरणाऱ्या आईचे दुख आंगात ताकत असेपर्यंत आईने केलेले रक्ताचे पानी हे लेखकाने पाहिले होते. तिचे कष्ट हे केवळ शारीरिक नव्हते तर कुटुंबाला टिकवून ठेवण्यासाठी चाललेली धडपड लेखकाने समजून घेतली होती. स्वाभिमान आणि जिद्द दारिद्र्य असले तरी आईने कधी कोणासमोर लाचारी पत्करली नाही. प्रतिकूल परिसतिथीशी लढा देताना तिने दाखविलेला स्वाभिमान, बऱ्याचदा आई स्वताच्या वेदना शब्दांत व्यक्त करत नसे. तर तिच्या मौनातूनच थकलेल्या चेहऱ्यांमगील वेदना लेखकाने ओळखल्या आणि तिला भावनिक आधार दिला. अशाप्रकारे लेखकाणे एक कणखर स्त्री म्हणून आपल्या आईला समजून घेतले.

प्रश्न 9

56 निबंध लेखन

अ)आई एक दैवत

निबंधलेखनाचेमुद्दे

आकर्षकप्रारंभ

विषयज्ञान

भाषा सौंदर्य

शेवट.

प्रश्न 10

57. कल्पना विस्तार

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

12. स्वरगंगा

प्रश्न 1.

1.अ) षष्ठी तत्पुरुष

2ब) षष्ठी तत्पुरुष

3 ड) कर्मधारेय

4.अ) चतुर्थी तत्पुरुष

5 ब) षष्ठी तत्पुरुष समास

6 ब) द्वंद्व समास

7 अ) षष्ठी तत्पुरुष

8 ब) तृतीय तत्पुरुष

9 क) चतुर्थी तत्पुरुष

10 अ) उपपद तत्पुरुष

11 ब) नञ् तत्पुरुष

12 अ)) नञ् तत्पुरुष

13 अ) कर्मधारय

प्र. 2 पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा

14 उत्तमकांबळे

15 एकपात्री नाटक

16 दुःख

17 ऱ्हस्व

१८ उजेड

19बेसुर

प्र. 3एका वाक्यात उत्तरे लिहा.

20 व्यक्तिचित्र

21 चिकाटी, ध्येयनिष्ठा

22 स्वरगंगा

23अब्दुल करीमखाँ

24 पाच मार्च 1913 या दिवशी धारवाड येथील शुक्रवार पेठेतल्या राहत्या घरी.

25 अंबाबाई

26 कृष्णाचार्य हुलगूर

27 द.रा. बेंद्रे

28 महात्मा गांधी

29 आपल्या जातीवरून आपला अपमान होईल याचे भय वाटत होते.

30 गंगुबाईनी भावगीते, भक्ती गीते गायली नाहीत.

31 सरकारी शाळेत इंग्लंडचा राजा व राणी जॉर्ज पंचम आणि किंग मेरी यांचा गौरव करणारी प्रार्थना म्हटली जात होती म्हणून गंगुबाईना ती प्रार्थना आवडत नव्हती

32 मामा वरेरकरांच्या विजयाचे लग्न या चित्रपटात भूमिका केली

33 शृंगेरी मठाचे शंकराचार्य.

34 गांधीजी, नेहरू,महंमद अली जिना,गंगाधर देशपांडे इत्यादी

35 धारवाड येथील राष्ट्रीय विद्यालय

36 मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प केला होता.

37 21 जुलै 2009 रोजी सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी

38 बेळगावी येथील काँग्रेस अधिवेशन

39 गंगुबाईना स्वरगंगा म्हटले आहे.

प्र 4 दोन/तीन वाक्यात उत्तरे

40. गंगुबाई हनगल यांना अनेक पुरस्कार व उपाधींनी सन्मानित करण्यात आले आहे.पद्मभूषण, पद्मविभूषण, तानसेन पुरस्कार, माणिक रत्न,कर्नाटक भूषण, गोदावरी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.याचबरोबर सहा विद्यापीठाने त्यांना डॉक्टरे ट देऊन गौरवले आहे.संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी , भारतीय कंठ, अशा विविध उपाधी त्यांना मिळाले आहेत.

41. गंगुबाईसाठी संगीत हाच त्यांचा श्वास होता आणि तोच त्यांचा ध्यास होता. नेपाळ, पाकिस्तान, अमेरिका,कॅनडा,फ्रान्स, जर्मनी अशा विविध देशात त्यांनी किराणा घराण्याची श्रीमंती पोहोचवली.

42. 1924 साली बेळगाव मध्ये काँग्रेसचे अधिवेशन झाले या अधिवेशनाचे अध्यक्ष महात्मा गांधी होते. या कार्यक्रमाचे स्वागत गीत गाण्याचा मान गंगुबाई व त्यांच्या शाळेतील इतर विद्यार्थिनींना मिळाला. त्यावेळी त्यांचे वय अवघे अकरा वर्षे होते स्वागत गीत शिकवण्यासाठी म्हैसूर होऊन एक शिक्षक आले होते.व्यासपीठावर गांधीजी, नेहरू, मोहम्मद अली जिना, गंगाधर देशपांडे इत्यादी बडी नेते मंडळी होती.मनात भीती असूनही स्वागत गीत इतके उत्तम झाले की प्रत्यक्ष गांधीजींनी त्यांना शाबासकी दिली. गंगुबाईची जात कोळी असल्याने त्या अधिवेशनात जातीवरून आपला अपमान होईल असे त्यांना वाटले पण तसे काही घडले नाही. या घटना दीर्घकाळ त्यांच्या स्मरणात राहिल्या.

43. गंगुबाईचा आवाज अतिशय पातळ नाजूक आणि बारीक होतात त्या गाऊ लागल्या की त्यांचा घसा दुखू लागेल म्हणून डॉक्टरांनी त्यांना टॉन्सिल चे ऑपरेशन करून घेण्याचा सल्ला दिला. शस्त्रक्रिया केल्यानंतर त्यांचा आवाज पूर्णतः बदलून गेला तो पुरुषी झाला पण गंगुबाई त्यामुळे खचल्या नाहीत ही एक दैवी देणगी आहे असे समजून जिद्दीने गाण्याचा सराव करू लागल्या

44. कुंदगोळ येथे सवाई गंधर्व यांच्याकडे गंगुबाई संगीताचे शिक्षण घेत होत्या खर्ज रियाजाची सक्त गुरुजींनी गंगू बाईना लावली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या पहाटे दोन दोन तास रियाज करत असत पुढे त्यांचे गुरु सवाई गंधर्व आपल्या मुलाच्या औषधोपचारासाठी हुबळीला येऊन राहिले त्यावेळी गंगूबाईनी आपल्या घरातील दोन खोल्या त्यांना राहण्यासाठी दिल्या त्याचे पैसे घेतले नाहीत. तसेच आपली मुलगी कृष्णा हिला शिकवणी लावून त्याचेही पन्नास रुपये फी त्या देऊ लागल्या.

45 करीम खाँ अंबाबाईच्याकडे आले असताना गंगुबाई अंबाबाईच्या जवळ बसल्या होत्या.त्यांनी गंगुबाईना विचारले तुही गातेस वाटतं,गंगुबाईनी मान हरवली मग गा बघू काहीतरी. खा साहेब म्हणाले गंगू बाईनी लगेच

त्यांना एक पद म्हणून दाखवले. एवढ्याशा नाजूक मुलीचा तो आवाज आणि ढंग पाहून खा साहेब उद्गारले बहुत अच्छा भेटी खूप खाना और बहुत गाना.

46. प्रा संध्या व्यंकटेश देशपांडे

जन्म 1958

नाट्याकुर या संस्थेची स्थापना

अजन्मा, आक्रित, अकलपित,वाज आय रॉंग एकांकिका

अश्वदा , सुलतान, बी पॉझिटिव या कादंबऱ्या

जीना इसी का नाम, अंतस्थ, कहाणी गोवा मुक्तीची ,मेघबंदन ही नाटके

मानवतावादी बसवण्णा (अनुवाद), स्वर गंगा (चरित्र)

अंतस्थ या नाटकात रत्नागिरीच्या श्रीरंग संस्थेचा लेखन पुरस्कार, कृ. ब. निकुंब,,पुरस्कार,गो. म. कुलकर्णी,,पुरस्कार

प्र. 5

47 संदर्भ:हे वाक्य प्रा संध्या देशपांडे यांनी लिहिलेल्या स्वरगंगा या पाठातील आहे

स्पष्टीकरण:लहानपणापासूनच गंगुबाईवर त्यांच्या आईने गायनाचे संस्कार केले कारण त्यांच्या आई अंबाबाई स्वतः कर्नाटकी संगीत गात होत्या गंगुबाईची गाण्याची आवड लक्षात घेऊन अंबाबाईनी स्वत:चे गाणे बंद केले व गंगुबाईना हिंदुस्थानी संगीताचे धडे दिले म्हणून वरील वाक्याचा उल्लेख लेखिकेने केला आहे.

48. स्पष्टीकरण:गंगुबाई हंनगल एकदा गाण्याच्या कार्यक्रमासाठी शृंगेरीच गेल्या होत्या शृंगेरी मठा शेजारीच कार्यक्रम असल्याने मठाधिपती शंकराचार्य ही गाणी ऐकायला

येऊन बसले कार्यक्रम संपल्यावर शंकराचार्यांनी गंगुबाईचे तोंड भरून कौतुक केले व त्यावेळी त्यांनी हे वरील वाक्य म्हटले.

49.स्पष्टीकरण: किराणा घराण्याचे संस्थापक अब्दुल करीम खान एकदा हगन ल यांच्या घरी आले होते.त्यांनी लहानग्या गंगुबाईला गाणे म्हणावयास लावले. गंगुबाईनी लगेच त्यांना एक पद म्हणून दाखवले. एवढ्याशा लहान मुलीचा तो दंग व आवाज ऐकून खा साहेबांनी वरील वाक्य म्हटले आहे.

50 स्पष्टीकरण: गंगुबाईचे गुरु कृष्णाचार्य हुलगुरू यांनी काही कारणास्तव गायनाची शिकवणी बंद केली. त्यामुळे कुंदगोळ येथे सवाई गंधर्वांच्या कडे संगीताचे शिक्षण घेऊ लागल्या. कुंदगोळात त्यावेळी वीज नव्हती. रात्रीच्या वेळी घरी परतताना गंगुबाईना त्रास होऊ नये म्हणून सवाई गंधर्व भीमसेन जोशींना त्यांच्यासोबत पाठवत त्यावेळी त्यांनी हे वरील वाक्य म्हटले आहे.

प्र 6. वाक्प्रचारांचा अर्थ

51. दाद देणे : कौतुक करणे

वाक्य: सुज्ञ रसिक कार्यक्रमात नेहमीच दाद देतात.

52.पाण उतारा करणे : अपमान करणे

वाक्य: मी दिलेला अभ्यास न केल्यामुळे शिक्षकांनी वर्गात माझा पाणउतारा केला.

53 पदार्पण करणे : प्रवेश करणे

वाक्य: सचिन तेंडुलकरने वयाच्या सोळाव्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.

54 योग जुळून येणे : योग्य वेळ येणे

वाक्य: काही गोष्टी साध्य करण्यासाठी योग जुळून यावा लागतो

55 पंचतत्वात विलीन होणे :स्वर्गवासी होणे.

वाक्य: 21 जुलै 2009 ला स्वरगंगा पंचतत्वात विलीन झाली.

56 डोक्यावर घेणे : गौरव करणे

वाक्य: चांगले काम करणाऱ्यांना नेहमीच डोक्यावर घेतले जाते

57 बाळकडू मिळणे : लहानपणी संस्कार मिळणे

वाक्य: लहानपणीच गंगुबाईना गायनाचे बाळकडू मिळाले होते.

58 तारीफ करणे : प्रशंसा करणे

वाक्य: माझा पहिला नंबर आल्याने सर्वांनीच माझी तारीफ केली

प्र. 7

59. गंगुबाईनावयाच्या सातव्या वर्षी धारवाडच्या राष्ट्रीय विद्यालयात दाखल करण्यात आले.तिथले वातावरण देशप्रेम आणि भरलेले होते. अनेक मोठमोठे साहित्यिक आणि राजकीय व्यक्ती येत असत. गंगुबाईना लोकमान्य टिळकांना पाहण्याचे योग याच शाळेत आला.वंदे मातरम भारत मातेचे वर्णन असणारी प्रार्थना तिथे म्हटले जात असे.विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच देशप्रेम, राष्ट्रभिमान जागृत करण्याचे पोषक वातावरण या शाळेत होते.

60. हुबळीतील डॉक्टर वागळे यांच्या घरी शृंगेरी मठाचे शंकराचार्य आले होते.तेथे त्यांनी गंगुबाईचे गाणे ऐकले.गाणे ऐकून ते इतके प्रभावीत झाले की गंगुबाईना गायनासाठी शृंगेरीस येण्याचे आमंत्रण दिले. एकदा गंगुबाई गाण्याच्या कार्यक्रमासाठी शृंगेरी ला गेल्या शंकराचार्य ही गाणे ऐकायला येऊन बसले होते.गाणे ऐकून ते खूप आनंदित झाले. शंकराचार्यांनी गंगुबाईना मठात बोलावले वशारदांबेच्या अंगावरील एक वस्त्र आणि साडी चोळी दिली. त्या दिवशीशारदांबेचा आशीर्वाद खऱ्या अर्थाने आपल्याला मिळाला असे गंगुबाईना वाटले.एक मौलिक ठेवा म्हणून गंगूबाईनी ते वस्त्र अनेक वर्ष जपून ठेवले.

प्र. 8 कल्पनाविस्तार

61. तनु त्या गीता कीर्ती मागे उरावी

62. पेरावे तसे उगवते(2025)

कल्पनाविस्ताराचे मुद्दे

कल्पनेचा अर्थ सांगणे

उदाहरण व स्पष्टीकरण

तात्पर्य

प्रश्न 9

63 आईच्या संस्कारामुळे लहानपणापासून गंगुबाईना गायनाचीआवडहोती. करीम खाँ, बेंद्रे गुरुजी यांनाही वेळोवेळी तिला प्रोत्साहन दिले.शालेय शिक्षण झाल्यावर त्यांनी हुबळीला कृष्णाचार्य हुलगूर यांच्याकडे संगीत शिक्षण सुरू केले. त्यावेळी त्यांचा आवाज पातळ नाजूक बारीक होता.म्हणून त्यांना गळ्यावर शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली तरीही त्यांनी आपले गाणे थांबवले नाही काही दिवसांच्या विश्रांतीनंतर त्यांनी पुन्हा रियाज सुरू केला. पुढे त्यांनी कुंदगोळ येथे सवाई गंधर्वांकडे शिकवणी लावली रात्री अंधार झाल्यावर त्यांना घरी यावे लागे.पहाटे दोन तास खर्जाचा रियाज त्या करत होत्या अशा प्रकारे गंगुबाईनी संगीत शिक्षणासाठी कष्ट घेतले.सवाई गंधर्व यांचा एक मुलगा आजारी व मतिमंद होता त्याच्या औषधोपचारासाठी ते हुबळीला येऊन राहू लागले गंगुबाईनी आपल्या घरातल्या दोन खोल्या त्यांना राहण्यासाठी दिल्या. जवळजवळ पंधरा वर्षे गंगुबाई सवाई गंधर्वांकडे शिकल्या गुरुजींनी कधीही गुरुदक्षिणा मागितीले नाही. आपण त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे म्हणून त्यांनी गुरुजींना आपली मुलगी कृष्णा हिला शिकवण्याची विनंती केली त्याची पन्नास रुपये फी सुद्धा त्या देऊ लागल्या.

